सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
RNI No. - MAHMAR 2023/84526
https://epaper.vidarbhaprajasattak.com
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - २१८ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि.२९ सप्टेंबर २०२५ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## बिहारमध्ये निवडणुकीचा धुरळा उडणार

### १ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर दरम्यान बिहारच्या निवडणुका होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९पाटना**

बिहारमध्ये सध्या राजकीय वातावरण तापले असून कोणत्याही क्षणी विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाची विधानसभा निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली आयोगाचा बिहारमध्ये दौरा होणार आहे. या दौऱ्यानंतर ७ किंवा ८ ऑक्टोबरला विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जारी होऊ शकते. त्यानंतर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू होईल.



बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीचं बिगुल लवकरच वाजणर आहे. बिहारमधील निवडणुका तीन टप्प्यात होण्याची शक्यता आहे. १ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या दरम्यान बिहारच्या निवडणुका पार पडू शकतात. २० नोव्हेंबरपर्यंत बिहारमध्ये नवीन सरकार स्थापन होण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. दोन किंवा तीन ऑक्टोबर रोजी आयोगाचा बिहार दौरा होणार आहे. त्यानंतर निवडणुकीची घोषणा करण्यात येईल.बिहार विधानसभेचा सध्याचा कार्यकाळ २२ नोव्हेंबर २०२५ रोजी संपत आहे. घटनात्मक तरतुदींनुसार या तारखेपूर्वी नवीन सरकार स्थापन होणे आवश्यक आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत पूर्ण करावी लागणार आहे. निवडणूक आयोगाच्या उच्चस्तरीय दौऱ्यावरून ऑक्टोबरमध्ये बिहारमध्ये आदर्श आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

आगामी सण-उत्सव पाहता निवडणूक आयोग नोव्हेंबरमध्येच मतदान घेण्याच्या प्रयत्नात आहे. ऑक्टोबरमध्ये दुर्गापूजा, दिवाळी आणि छठसारखे सण आहेत. त्यामुळे निवडणुकांच्या तारखांचे नियोजन याच गोष्टी लक्षात घेऊन केले जाईल. २०२० मध्ये बिहार विधानसभा निवडणूक तीन टप्प्यांत झाली होती. यावेळीही दोन ते तीन टप्प्यात निवडणुका होण्याची शक्यता आहे.

## नगर शहरात दोन गटात तणाव
## दगडफेक, रस्तारोको, लाठीमार

### पोलिसांनी कोठला परिसरात दगडफेक व तोडफोड केल्याप्रकरणी २२ जणांना घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अहिल्यानगर**

अहिल्यानगर शहरात आज, सोमवारी सकाळी दोन गटात तणावाची घटना घडून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना दोनदा लाठीमार करावा लागला. दरम्यान शहरात विविध अफवा पसरल्याने तणावाचे वातावरण होते. बाजारपेठा बंद होत्या. शहरात ठिकठिकाणी गटागटांनी दोन्ही बाजूचे जमाव चर्चा करत थांबून होते. रास्ता रोको, दगडफेक करणाऱ्या २२ जणांना आतापर्यंत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवरात्रानिमित्त शहरात दुर्गादौडचे आयोजन





करण्यात आले होते. ही दौड शहराच्या मध्यवर्ती माळीवाडा भागातून जाणार होती. त्याच्या स्वागतासाठी रांगोळी काढण्यात आली होती. त्यावरून दौड नियोजन केले होते. ही रांगोळी आक्षेपार्ह असल्याची तक्रार करत माळीवाडा भागात जमाव जमला. या जमावाने आक्रमक भूमिका घेत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. दरम्यान कोतवाली पोलिसांनी रांगोळी काढणाऱ्या एका जणास ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.त्या पाठोपाठ जमाव पोलीस ठाण्यात जमा झाला. विरुद्ध बाजूचा जमावही तेथे आला. दोन्ही बाजूचा जमाव समोरासमोर आला घोषणाबाजी करू लागला. या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला.लाठीमार झाल्याचा निषेध करण्यासाठी एका गटाचा जमाव कोठला भागात जमा झाला त्याने महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. आंदोलन बराच काळ चालल्याने दगडफेकीला सुरुवात झाली. त्यामध्ये काही वाहनांचे नुकसान झाले. पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी पुन्हा लाठीमार केला. त्यानंतर पळापळ सुरू झाली. काही वेळाने परिस्थिती नियंत्रणात आली.या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कुलबर्मे, उपअधीक्षक दिलीप टिपरसे व शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह मोठा फौजफाटा रस्त्यावर उतरला होता. पोलिसांनी कोठला परिसरात दगडफेक व तोडफोड केल्याप्रकरणी २२ जणांना ताब्यात घेतले आहे.

## 'राहुल गांधींनी टीम इंडियाला विजयाच्या शुभेच्छा का दिल्या नाही?', भाजपाचा सवाल

### काँग्रेस पाकिस्तानची बी टीम असल्याचा केला आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नवी दिल्ली**

भारतीय संघाने पाकिस्तानचा पराभव करत आशिया चषक २०२५ च्या जेतेपदावर नाव कोरलं. आशिया चषकाच्या या सामन्यात या दोन्ही संघांमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात भारताने बाजी मारली. पाकिस्तानला हरवल्यानंतर भारताने ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. यामागचं कारण म्हणजे ही ट्रॉफी मोहसीन नक्वी यांच्या हस्ते देण्यात येणार होती. मोहसीन नक्वी हे आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आहेत, तसेच ते पाकिस्तान बोर्डाचे अध्यक्ष आणि पकिस्तानचे मंत्री देखील आहेत.

या सर्व घडामोडी सुरू असतानाच आता भारतीय संघाचं कौतुक करण्यावरून राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. भारताने आशिया चषक जिंकल्यानंतर काँग्रेसने टीम इंडियाचं अभिनंदन न केल्याचा आरोप करत भाजपाने काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करत त्यांनी टीम इंडियाला अद्याप शुभेच्छा का दिल्या नाहीत? असा सवाल भाजपाने केला. तसेच काँग्रेस पाकिस्तानची बी टीम असल्याचा आरोप करत राहुल गांधी हे असीम



मुनीर यांचे चांगले मित्र असल्याचंही भंडारी यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.

भारताने पाकिस्तानला हरवल्याबद्दल राहुल गांधींनी भारतीय क्रिकेट संघाचं अद्याप अभिनंदन केलं नाही. काँग्रेस नेहमीच भारतापेक्षा पाकिस्तानला का पाठिंबा देते?, असं प्रदीप भंडारी यांनी म्हटलं. तसेच ऑपरेशन सिंदूरमध्ये काँग्रेस पाकिस्तानबरोबर उभी होती. 'ऑपरेशन तिलक'मध्ये काँग्रेस पाकिस्तानबरोबर उभी होती. राहुल गांधी हे असीम मुनीर यांचे सर्वात चांगले मित्र आहेत, अशा खोचक शब्दांत प्रदीप भंडारी यांनी काँग्रेसवर घणाघात केला.

## आधी पाकिस्तान संघाची जिरवली, मग अख्ख्या जगासमोर घेतला पाक मंत्र्याचा बदला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अबुधाबी**

बईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या आशिया चषक २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्यात भारतीय संघाने ५ विकेट्स राखून दिमाखदार विजय नोंदवला. आधी साखळी फेरीत, मग सुपर फोर आणि त्यानंतर फायनलचं मैदान मारत टीम इंडियानं एकाच स्पर्धेत तीन वेळा पाकिस्तान क्रिकेट संघाची जिरवली. फक्त क्रिकेट खेळायला आलोय, पाकिस्तानी खेळाडूंची हात मिळवायला नाही, अशी भूमिका घेत टीम इंडियाने आशिया कप स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धच्या लढतीला सुरुवात केली होती. त्याचा शेवट टीम इंडियाने पाकिस्तानी मंत्री अन् आशियाई क्रिकेट परिषदेचे आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन



नक्वी यांच्याकडून ट्रॉफी न स्वीकारण्याचा निर्णय घेतला. ही गोष्ट -उउ अध्यक्ष अन् पाक मंत्री मोहसिन नक्वी यांची जगासमोर अब्रू काढण्यातला प्रकार होता. ही वेळ येण्यामागे ते स्वत:ही तेवढेच कारणीभूत आहेत.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाक यांच्यात निर्माण झालेले तणावपूर्ण वातावरण हे या निर्णयामागचं प्रमुख कारण आहे. त्याशिवाय फायनल आधी मोहसिन नक्वी यांनी सोशल मीडियावरुन शेअर केलेल्या पोस्टनं वातावरण आणखी तापवल्याचे बोलले जात आहे. मोहसिन नक्वी यांनी फायनलआधी सोशल मीडियावरील एक्स प्लॅटफॉर्मवरून एक पोस्ट शेअर केली होती. 'फायनल डे'चा माहोल दाखवणाऱ्या या पोस्टमध्ये पाकिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार सलमान अली आगा, जलदगती गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी अन् हारिस रौफ याच्यासह अन्य खेळाडूंना फायटर जेटच्यासमोर फ्लाइट सूटमध्ये दाखवण्यात आले होते. क्रिकेट प्रशासकानं राजकीय विचाराने प्रेरित पोस्टसह फायनलला क्रिकेट संघाच्या माध्यमातून सैन्य शक्ती प्रदर्शनाचा जो खेळ खेळला, तो मोहसिन नक्वी यांच्या अंगलट आला, असेही बोलले जात आहे.

### आधी पाकिस्तान संघाची जिरवली, मग जगासमोर पाक मंत्र्याची फजिती

टीम इंडियान खेळ आणि राजकारण या दोन गोष्टी वेगळ्या आहेत असं म्हणत आशिया कप स्पर्धेत खेळण्याची तयारी दर्शवली होती. पण मोहसिन नक्वी यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून राजकीय गोष्टीवर भर दिला. जर त्यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारली तर याचा अर्थ त्यांच्या भडकाऊ पोस्टला समर्थन दिल्याचा प्रकार होईल, हीच गोष्ट लक्षात घेऊन भारतीय संघाने मोहसिन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला, असेही समोर येत आहे. दुबईच्या मैदानात पाकिस्तानी संघाची जिरवल्यावर प्रोटोकॉल मोडत टीम इंडियाने आशियाई क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षस्थानी बसलेल्या पाक मंत्र्याची अब्रूच काढल्याचे पाहायला मिळाले.

## 'हरे राम हरे कृष्ण, वोट चोर गद्दी छोड' च्या घोषणा देत दीक्षाभूमीहून तुषार गांधी यांची पदयात्रा सेवाग्राम कडे निघाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

'हम भारत के लोग' या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान सत्याग्रह पदयात्रेला आज सकाळी साडेसहा वाजता नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीतून जल्लोषात सुरुवात झाली. ही पदयात्रा सेवाग्राम येथील बापू कुटीपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. संविधानाच्या रक्षणासाठी, लोकशाहीच्या मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी व गांधी विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने ही यात्रा सुरू करण्यात आली आहे.

पदयात्रेच्या उद्घाटनप्रसंगी मोठ्या संख्येने नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष म्हणजे काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज





नेते यामध्ये सहभागी झाले होते. यामध्ये काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री सुनील केदार, राजेंद्र मुळक, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, तसेच सामाजिक कार्यकर्त्या व शिवसेना उद्धव गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, अवंतिका लेकुरवाळे, काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे, कुंदा राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष दिनेश्वर पेठे यांचा सहभाग लक्षणीय होता.

पदयात्रेचा आरंभ ढोल-ताशांच्या गजरात व भजन मंडळींच्या भक्तिगीतांनी झाला. संपूर्ण मार्गात हरे राम हरे कृष्ण, देवकीनंदन गोपाला, वोट चोर गद्दी छोड़, संविधान बचाओ, लोकशाही वाचवा, अशा घोषणा देण्यात येत होत्या. या घोषणांमधून सरकारविरोधी भावना आणि संविधान रक्षणाबाबत जनजागृतीचा स्पष्ट संदेश दिला जात होता.

## पंडित दीनदयाल सेवा प्रतिष्ठान एकात्म मानव दर्शन व अंत्योदयाचे प्रतिक -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा जयंती समारोह उत्साहात संपन्न : दीनदयाल संस्थेच्या प्रकल्पांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ यवतमाळ,**

समाजातील गोर-गरीब, वंचित दुर्बल घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी आपले संपूर्ण जीवन वेचले. त्यांचा एकात्म मानव दर्शन व अंत्योदयाचा संदेश सर्वदूर पाहोचविण्यासाठी दीनदयाल सेवा प्रतिष्ठान हे प्रतिक ठरेल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज काढले.

यवतमाळ येथील दीनदयाल सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती समारोहाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हसंराज अहीर, माजी आमदार मदन येरावार तसेच दीनदयाल सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरहर देव, पदाधिकारी ज्योती चव्हाण, डॉ. मनोज पांडे, विजय कद्रे, मनीष गंजीवाले, गजानन परसोडकर आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, यवतमाळ येथील दीनदयाल सेवा प्रतिष्ठान ही जवळपास २५ वर्षांपूर्वी सुरू झालेली संस्था आज एका मोठ्या वटवृक्षाप्रमाणे विस्तारली असून, ती आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिला आणि अतिशय मागासलेल्या आदिवासी पारधी समाजाला मदतीचा हात देत आहे. या संस्थेने पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन आणि अंत्योदय या विचारांवर आधारित समाज परिवर्तनाचं एक जीवंत उदाहरण तयार केले आहे, असे प्रतिष्ठानाच्या कार्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी यावेळी कौतूक केले.

पंडीत दीनदयाल यांनी अत्यंत खडतर जीवनातून मार्गक्रमण करीत कष्टमय जीवन जगून अभ्यासाचा ध्यास धरुन शिक्षण पूर्ण केले. सरकारी





नोकरीची संधी असताना सुध्दा त्यांनी ती नाकारली. इंग्रजांची नोकरी करण्याऐवजी त्यांनी आपल्या समाजाची सेवा करण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आल्यानंतर ते पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून काम करू लागले. नंतर, जनसंघाची स्थापना झाल्यावर त्यांनी उत्तर प्रदेशचे प्रमुख, अखिल भारतीय महामंत्री आणि नंतर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळली. एवढ्या मोठ्या पदांवर असतानाही त्यांच्या जीवनशैलीत कोणताही बदल न होता ते त्यागपूर्ण जीवन जगले, असे सांगत पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनप्रवासावर मुख्यमंत्र्यांनी यावेळी अनेक पैलू उलगडत प्रकाश टाकला.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या काळात जगामध्ये भांडवलशाही आणि साम्यवाद या दोन विचारसरणींचा बोलबाला होता. या दोन्ही विचारांपेक्षा वेगळा तिसरा विचार त्यांनी मांडला. भारतीय जीवन पद्धतीतच सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचं उत्तर आहे, असे पंडित दीनदयाल यांनी सांगितलं होतं. एकात्म मानव दर्शनाचं मूळ तत्त्व 'अंत्योदय' आहे, ज्याचा अर्थ समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या विकासातूनच राष्ट्राचा विकास करणे होय. समाजातील शेवटचा दूर्बल घटक हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. राष्ट्राचा सर्वांगिण विकास करावयाचा असल्यास समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत सर्व सुविधा पोहोचल्या पाहीजे, हा विचार त्यांनी सर्वदूर पोहोचवला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याच अंत्योदय विचारावर काम करीत असून त्यांनी गरिबांसाठी घरे, शौचालये, गॅस, वीज आणि रोजगार यावर गुंतवणूक केली. या धोरणामुळेच गेल्या १० वर्षांत २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर पडले. यामुळेच भारत जगातील ११ व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

संस्थेच्या परिसरात उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण प्रबोधिनि, शबरी अतिथी गृह, निवासी संकुल, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कक्ष, कृषी संशोधन व प्रशिक्षण केंद्र आदींची पाहणी करून प्रवेशव्दारा समोरील पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. पंडित दीनदयाल यांच्या जीवनपटाचीही माहिती त्यांनी घेतली. यावेळी निवासी संकुलाच्या आवारात मुख्यमंत्र्यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## संपादकीय ......

# राजकीय 'पर्यावरण' धोकादायक वळणार

एकीकडे निसर्ग रौद्र अवतार दाखवत आहे, तर दुसरीकडे समाजात धार्मिक तेढ आणि राजकीय मतभेद टोकाला पोहोचले आहेत. या दोन्ही आघाड्यांवरील संकटं एकमेकांशी जोडलेली असून, ती देशाच्या भविष्यासाठी एक गंभीर आव्हान निर्माण करत आहेत. या सामाजिक अस्वस्थतेचे ताजे उदाहरण म्हणजे, उज्जैनमध्ये पेटलेले पोस्टर वॉर. २३ सप्टेंबर रोजी उज्जैनच्या ईदगाहवर अचानक 'आय लव्ह मोहम्मद' असे पोस्टर झळकले. पोलिसांनी ते तत्काळ हटवले; पण तोपर्यंत त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने पसरला होता. या घटनेला प्रत्युत्तर म्हणून दुसर्याच दिवशी कालिदास अकादमीमध्ये सुरू असलेल्या गरबा कार्यक्रमात 'आय लव्ह महाकाल'चे पोस्टर लावण्यात आले. वरकरणी या घटना किरकोळ वाटत असल्या, तरी त्या समाजाच्या ऐक्याला तडा देण्याचे काम करत आहेत. या प्रकारच्या घटनांमागे मतांचे ध्रुवीकरण करून निवडणुकीत फायदा मिळवण्याचा छुपा अजेंडा असतो; मात्र त्याचे गंभीर परिणाम समाजाला भोगावे लागतात.

पोस्टरच्या या राजकारणाची सुरुवात यापूर्वी कानपूरमध्ये झाली होती, जिथे 'आय लव्ह मोहम्मद' लिहिलेल्या पोस्टरवरून मोठा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर इंदूरमध्येही असेच प्रकार घडले. हिंदुत्ववादी संघटनांनी याला शहराचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले. यावर विश्व हिंदू परिषदेने एक सूचक विधान केले. मुस्लीम समाज त्यांच्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये हजरत मोहम्मद यांचे पोस्टर लावत असेल, तर त्यावर आक्षेप नाही; पण या कार्यक्रमांमध्ये घोषणाबाजी किंवा दुसर्या धर्मावर टीका-टिप्पणी केली गेली, तर ते अस्वीकारार्ह असेल, असे परिषदेने म्हटले. हे विधान एकाच वेळी सल्ला आणि इशारा दोन्ही देणारे आहे. एकीकडे सामाजिक वातावरण बिघडत असताना देशाचे राजकीय पर्यावरणही निरोगी नाही. सत्ताधारी पक्षापासून ते विरोधी पक्षांपर्यंत, सर्वच पक्षांमध्ये अंतर्गत संतुलनाचा अभाव दिसतो.

सत्ताधारी भाजपही याला अपवाद नाही. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मार्गदर्शक मंडळाचे सदस्य मुरली मनोहर जोशी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील मतभेद पुन्हा एकदा समोर आले आहेत. जोशी यांनी पर्यावरणाच्या मुद्द्यावरून थेट सरकारच्या धोरणांवर टीका केली आहे. त्यांनी चारधाम महामार्ग प्रकल्पावर टीका करताना म्हटले की, डोंगरांमध्ये रुंद रस्ते बांधल्यामुळे भूस्खलन आणि अचानक येणार्या पुराच्या घटना वाढल्या आहेत. त्यांच्या मते हा प्रकल्प पर्यावरणासाठी धोकादायक आहे. जोशी यांनी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दाही उपस्थित केला. सामान्यांची वाढती वर्दळ लष्कराच्या हालचालींमध्ये अडथळा आणू शकते, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. काँग्रेसमध्येही गांधी घराण्याच्या नेतृत्वाविरोधात शशी थरूर आणि मनीष तिवारी यांच्यासारखे नेते सातत्याने आवाज उठवत आहेत. यावरून दिसते की, कोणत्याही पक्षात अंतर्गत लोकशाही आणि समन्वयाचा अभाव आहे.

सरकारच्या विकासनीती आणि नैसर्गिक आपत्ती यांच्यातील संबंध आता लपून राहिलेला नाही. महाराष्ट्रात यावर्षी एकाच वेळी पूर आणि दुष्काळ या दोन्ही टोकाच्या परिस्थितीने थैमान घातले. काही भागांत नद्यांनी गावेच्या गावे गिळंकृत केली, तर दुसरीकडे पाण्याअभावी शेतकर्यांचे कंबरडे मोडले. हे चित्र जल व्यवस्थापन आणि पर्यावरण संतुलनाबाबत गंभीर धोरणांचा अभाव असल्याचे स्पष्ट करते. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती तर आणखी भयावह आहे. विकासाच्या नावाखाली डोंगर पोखरून रुंद रस्ते, मोठे हॉटेल्स आणि जलविद्युत प्रकल्प उभारले जात आहेत. याचा परिणाम म्हणून भूस्खलन, ढगफुटी आणि दरडी कोसळण्याच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. तज्ज्ञ वारंवार इशारे देत आहेत की, हिमालयीन प्रदेश इतक्या मोठ्या प्रमाणात बांधकाम आणि यंत्रसामग्रीचा भार सहन करू शकत नाही; मात्र या इशार्यांकडे दुर्लक्ष करून निसर्गाशी खेळ सुरूच आहे, ज्याची किंमत निष्पाप लोकांना जीव गमावून चुकवावी लागत आहे.

उत्तराखंड आणि लडाख या राज्यांमधील घटना एका नव्या राजकीय क्रांतीचे संकेत देत आहेत. उत्तराखंडमध्ये बेरोजगार तरुण-तरुणी रस्त्यावर उतरून सरकारच्या धोरणांना आव्हान देत आहेत. विशेष म्हणजे, या आंदोलनाचे नेतृत्व मुली करत आहेत; मात्र त्यांच्या मागण्या ऐकून घेण्याऐवजी उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना जिहादी संबोधून आगीत तेल ओतण्याचे काम केले. लडाखमध्ये गेल्या पाच वर्षांपासून सहाव्या अनुसूचीनुसार घटनात्मक संरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन सुरू होते. सरकारने याकडे सातत्याने दुर्लक्ष केले. अखेर लोकांच्या संयमाचा बांध फुटला आणि संतप्त जमावाने भाजपच्या कार्यालयाला आग लावली. सरकारने या घटनेला विदेशी शक्तींचे षड्यंत्र म्हटले असले, तरी हा स्थानिक लोकांच्या मनात वर्षानुवर्षे साचलेल्या असंतोषाचा स्फोट आहे. २०१९ मध्ये भाजपने लडाखला राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते, जे अद्याप पूर्ण झालेले नाही.बेरोजगारी, आर्थिक विषमता आणि पर्यावरणाचा र्हास यावर ठोस उपाययोजना करण्याची आज नितांत गरज आहे; पण राजकीय पक्ष सध्या केवळ निवडणुकीच्या गणितांमध्ये गुंतले आहेत. प्रश्न हा आहे की, सरकार या बिघडत्या वातावरणाला वेळीच सावरणार का, की हा असंतोष आगामी निवडणुकांमध्ये आणि रस्त्यांवर एका मोठ्या वादळाचे रूप धारण करणार, याचे उत्तर भविष्याच्या उदरात दडलेले आहे; पण सध्याची परिस्थिती चिंताजनक आहे, हे निश्चित!

# महिलांना अर्ध्या किमतीत ट्रॅक्टर खरेदी करता येणार, काय आहे ही योजना जाणून घ्या




**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक** - महिलांना सक्षम करण्यासाठी, केंद्र सरकारने योजनेअंतर्गत ट्रॅक्टरवर ५० टक्के अनुदान दिले आहे. त्यामुळे केवळ अर्ध्या किमतीत महिलांना ट्रॅक्टर खरेदी करता येणार आहे. काय आहे ही योजना, जाणून घेऊयात सविस्तर...

तर केंद्र सरकारच्या माध्यमातून कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान ही योजना राबवली जाते. या योजनेचा प्राथमिक उद्देश लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किमतीत शेतीसाठी आवश्यक असलेली आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे आहे. महत्त्वाचे म्हणजे, या योजनेअंतर्गत महिलांना विशेष लाभ मिळण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

केंद्र सरकार ९० टक्के आणि राज्य सरकार १० टक्के निधी देतात. समजा एखाद्या महिला शेतकऱ्याला ४.५ लाख रुपयांचा ट्रॅक्टर खरेदी करायचा असेल. जर ट्रॅक्टरची किंमत ४ लाख ५० हजार रुपये असेल, तर ५० टक्के सबसिडीचा अर्थ महिला शेतकरी २ लाख २५ हजार रुपये देईल, म्हणजेच महिला शेतकऱ्याला फक्त अर्धा खर्च द्यावा लागेल आणि उर्वरित अर्धा खर्च सरकार भरेल.

दरम्यान, जर एखाद्या सामान्य शेतकऱ्याने तोच ट्रॅक्टर खरेदी केला तर त्यांना १ लक्ष ८० हजार रुपयांच्या ट्रॅक्टरसाठी ४० टक्के सबसिडीसह २ लाख ७० हजार रुपये द्यावे लागतील. परिणामी, महिला शेतकऱ्यांना पुरुष शेतकऱ्यांपेक्षा ४५ हजार रुपयांची सूट मिळेल. म्हणूनच ही योजना महिला शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे.

**कोणती कागदपत्रे लागतील?**

आधार कार्ड, बँक पासबुकची प्रत, जमीन नोंदी (खसरा/खतौनी), पासपोर्ट-आकाराचा फोटो, उत्पन्न आणि जातीचा दाखला (जर आवश्यक असेल तर), महिला शेतकरी असल्याचा पुरावा (जसे की रेशन कार्ड किंवा शेतकरी नोंदणी)

**अर्ज कसा करावा?**

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करावा. त्यासाठी प्रथम अधिकृत पोर्टल https://agrimachinery.nic.in qH$dm https://myscheme.gov.in ला भेट द्या.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## रोगप्रतिकारशक्तीचा खजिना आणि कर्करोगावर प्रभावी ब्रोकोली आहे 'सुपरफूड'!



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या काळात 'सुपरफूड' म्हणून ओळखली जाणारी ब्रोकोली ही एक अशी भाजी आहे, जी आपल्या आहारात असायलाच हवी. फुलकोबीसारखी दिसणारी ही हिरवीगार भाजी केवळ चवीलाच चांगली नाही, तर ती अनेक गंभीर आजारांपासून आपले संरक्षण करते. व्हिटॅमिन, मिनरल्स आणि फायबरने समृद्ध असलेली ब्रोकोली आरोग्यासाठी एक वरदानच आहे. ब्रोकोली खाणे का महत्त्वाचे आहे आणि त्याचे कोणते प्रमुख आरोग्य फायदे आहेत, ते जाणून घेऊया.

ब्रोकोलीचे प्रमुख आरोग्यदायी फायदे

**१. कर्करोगाचा धोका कमी करते**

ब्रोकोलीमध्ये सल्फेराफेन नावाचे एक शक्तिशाली संयुग आढळते. सल्फेराफेन शरीरातील कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखण्यास मदत करते, विशेषतः फुफ्फुस, ब्रेस्ट, प्रोस्टेट आणि कोलन कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी हे प्रभावी मानले जाते. ब्रोकोली नियमित आहारात असल्यास शरीराचे डिटॉक्सिफिकेशन सुधारते.

**२. रोगप्रतिकारशक्ती वाढवते**

ब्रोकोली व्हिटॅमिन सी चा उत्तम स्रोत आहे. एका मध्यम आकाराच्या ब्रोकोलीमध्ये आपल्या दैनंदिन गरजेपेक्षा अधिक व्हिटॅमिन सी असते. व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारशक्ती वाढवते आणि शरीराला संसर्गाशी लढण्यास मदत करते.

**३. हृदय निरोगी ठेवते**

ब्रोकोलीमध्ये असलेले फायबर (ऋळलशी), पोटॅशियम आणि अँटिऑक्सिडंट्स हृदयाच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. ब्रोकोली खाल्ल्याने कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहते आणि रक्तवाहिन्या निरोगी राहतात. यामुळे उच्च रक्तदाब कमी होण्यास मदत होते.

**४ पचनक्रिया सुधारते**

ब्रोकोलीमध्ये फायबरचे प्रमाण खूप जास्त असते. हे फायबर पचनसंस्थेचे आरोग्य सुधारते, आतड्यांची हालचाल नियमित ठेवते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यास मदत करते. पचनसंस्थेतील 'चांगल्या बॅक्टेरिया'च्या वाढीसाठीही ब्रोकोली उपयुक्त आहे.

**५ दृष्टी सुधारते** ब्रोकोलीमध्ये बीटा-कॅरोटीन , व्हिटॅमिन ए, ल्युटीन आणि झियाझॅन्थिन सारखे घटक आढळतात. हे घटक डोळ्यांच्या आरोग्यासाठी आणि दृष्टी सुधारण्यासाठी आवश्यक आहेत. मोतीबिंदू (उरींरीरलीं) आणि वयानुसार येणाऱ्या 'मॅक्युलर डिजनरेशन' सारख्या समस्यांचा धोका कमी करण्यासाठी ब्रोकोली उपयुक्त आहे.

# उध्दव ठाकरे यांनी दसरा मेळावा रद्द करून तो खर्च पूरग्रस्ताना द्यावा; भारतीय जनता पक्षाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मुंबई** - राज्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. मराठवाड्यात गेल्या आठवड्यात आणि आता पुन्हा शुक्रवार रात्रीपासून पावसाने थैमान घातले आहे. मराठवाड्यातील शेतीचे आणि शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मराठवाड्यातील पूरपरिस्थिती भयंकर आहे. लोकांच सगळं उध्वस्त झालं आहे. याचा विचार करुन आता उद्धव ठाकरे यांनी त्यांचा दसरा मेळावा रद्द करुन तो खर्च पूरग्रस्तांना द्यावा, असे आवाहन भारतीय जनता पक्षाकडून करण्यात आले आहे.

**उपाध्येंची ठाकरेंवर उपरोधिक टीका** - भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी एक्स सोशल मीडियावर ट्विट करुन ठाकरे गटाने त्यांचा दसरा मेळावा यंदा रद्द करावा आणि त्याचा खर्च पूरग्रस्तांना देण्याची मागणी केली आहे. 'उद्धव ठाकरे यांनी पाच जिल्ह्यांचा तब्बल तीन तासांचा दौरा करुन दुःख, वेदना, व्यथा व्यक्त केली आहे. त्यांच्या भावना पाहून सगळेच अस्वस्थ झाले आहेत,' अशी उपरोधिक टीका केली आहे.




उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदावर असताना कोणतीही कृती केली नाही. घरात बसून राहिले. आता त्याचे प्रायश्चित्त मराठवाड्यातील पूरग्रस्तांना मदत करुन करता येईल, अशी टीका करताना उपाध्ये म्हणाले की, 'उद्धवराव, आता वेळ आहे कृती करायची. मुख्यमंत्री असताना तर कधी कृती न करता घरात बसून राहिलात, आता त्याचे प्रायश्चित्त घेण्याची वेळ आली आहे. दसरा मेळावा रद्द करून तो खर्च पूरग्रस्ताना दिला पाहिजे. तर त्यांच्या व्यथा आणि वेदनांवर संवेदना व्यक्त करायला अर्थ असेल.'

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे असताना या दसरा मेळाव्यात विचारांचे सोने लुटले जायचे, आता तिथे येऊन मिंधे, गद्दार, माझा पक्ष चोरला एवढीच टेप वाजवणार, नुसताच थयथयाट अन् कांगावा करणार. त्यासाठी बिचाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला भुर्दंड पाडून लाखोंचा खर्च कशाला करायचा? ते रडगाणं तर सामनातून चालूच असतं, असा टोला त्यांनी लगावला आहे.भाजप प्रवक्ते उपाध्ये यांचे आवाहन आणि टीकेला आता शिवसेना ठाकरे गट कसे प्रत्युत्तर देणार हे पाहणे महत्त्वाचे राहणार आहे. यंदाच्या दसरा मेळाव्यात मनसे प्रमुख राज ठाकरे उपस्थित राहणार का, याची ठाकरेंच्या शिवसैनिकांसह अनेकांना उत्सूकता आहे.

# विदर्भाला न्याय द्या, पृथक विदर्भ राज्य हवेच...

## इर्विन चौकात नागपूर कराराची होळीयुवकांचा लक्षणीय सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती** - पृथक विदर्भ राज्य मुक्ती संग्रामाच्या १२० वर्षांच्या लक्ष्याला अधोरेखित करत रविवार २८ सप्टेंबर रोजी, नागपूर करार निषेध दिवस म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात, या कराराची होळी करून पाळण्यात भाला. २८ सप्टेंबर १९५३ रोजी झालेल्या नागपूर कराराने विदर्भाचा सर्वांगीण विकास होईल, अशा अनेक ठरतुदी करण्यात आल्या होत्या. मात्र या तरतुदी आजपर्यंत फसव्या ठरल्याचा आरोप करून विदर्भवाद्यांनी संताप व्यक्त केला. या प्रसंगी विदर्भ प्रदेश महिला आघाडी अध्यक्ष रंजनाताई मामडे व पश्चिमविदर्भ अध्यक्ष प्रा. डॉ. पी. आर. राजपूत यांच्या नेतृत्वात आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सुषमा मुळे, शिक्षक क्षेत्रातील उदयोन्मुख नेतृत्व प्रा. डॉ. प्रशांत विधे, शिव विचारांचे खंदे समर्थक नितीन पवित्रकार, कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्मा राजपूत, प्रकाशलड्डा, डॉविजयकुबडे, सतीश प्रेमलवार, अफसर भाई, प्रकाश भाऊ साबळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत वक्तधांनी, विदर्भाच्या अन्यायग्रस्त वास्तवावर प्रकाश टाकला.

राज्यातील २६ पैकी २३ खनिजे विदर्भात असूनही फक्त दोनच उद्योग येथे आले. तयार होणारा ६२०० मेगावॅट विजेपैकी केवळ २२०० मेगावॅट विजेचा वापर विदर्भासाठी केला जातो. १३१ पैकी केवळ १३ धरणे पूर्ण झाली असून उर्वरित निधीअभावी रखडली आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, वाहतूक, सिचन, शेतकरी आत्महत्या आणि नक्षलवाद या सर्वच क्षेत्रांत विदर्भाचे आजचे वास्तव विदारक असल्याचे त्यांनीनमूद केले, नागपूरकरार निषेध दिनाच्या कार्यक्रमास विदर्भ मुक्ती चळवळीतील कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विदर्भालान्यायद्या, पृथकविदर्भराज्य हवेच अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी रोख इसाक शेख मोहम्मद, अफसर नाई, राजेंद्र आगरकर, ललीत गवळी, प्रा. राजु पुसदेकर, विजयसिह सिसोदिया, रंजनाताई मामडें, प्रा. डॉ पृथ्वीराजसिह राजपूत, मोहमद अफसर, जिवन पंचगाडे, स्वप्नील वाकोडे,इंगळे, अनिल मावेश सु डोगरे, संदीप राऊत शुभम सु. सोनाने, राहुल खाडके किशोर पेंढारकर, अजम डोळस, अशोक ढोके, नितीन ओगले, साहेबराव वानखडे, अजय मिलके, दिलीप पेठे, दिवांशु वानखेडे, विनायक इंगोले, सतीश प्रेमलवार, प्रमोय तायडे डॉ. विजय कुबडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजेंद्र आगरकर, जीवन पचगाडे, अनिल वानखेडे यांनी परिश्रम घेतले

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना उजाळणार दुर्गम भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान

## डाबका उपकेंद्रासाठी ५ मेगावॅटचे सौर प्रकल्प कार्यान्वित, मेळघाटातील ८३९ शेतकऱ्यांना दिवसा वीज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्प लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून या प्रकल्पातून दिवसा वीज उपलब्ध होत असल्याने, उत्पनात झालेल्या बदलाच्या यशोगाथा जाणून घेतल्या आणि कालच मेळघाटातील अतीदुर्गम भागातील डाबका उपकेंद्रासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ५ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला.या प्रकल्पामुळे मेळघाटाच्या दुर्गम भागातील ८३९ शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार आहे.मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांची दिवसा आणि शाश्वत वीजेची मागणी पूर्ण होत आहे.शिवाय मेळघाटासारख्या दुर्गम आणि व्याघ्रप्रकल्प असलेल्या भागात सौर प्रकल्प उभारून शेतकऱ्यांना दिवसा विजेची सोय झाल्याने, मेळघाटातील शेतकऱ्यांच्या




उत्पन्नात वाढ होणार असून शेतकऱ्यांना आता आपल्या शेतात एकापेक्षा जास्त पीके घेता येणार आहे.मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात परिमंडळात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली असून अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात २८ मेगावॅट क्षमतेचे ७ प्रकल्प पुर्ण होवून या प्रकल्पातून ११ हजापेक्षा जास्त शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळायला सुरूवात झाली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत डाबका उपकेंद्रा अंतर्गत असलेल्या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मे.पुरूषोत्तम प्रोफाईल या विकासकामार्फत ५ मेगावॅट क्षमता असलेले सौर प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे डाबका उपकेंद्रातून वीज पुरवठा होणाऱ्या ८३९ शेतकऱ्यांना दिवसा विजेची सोय झाल्याने शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण

## अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करण्याकरिता

# काँग्रेसची विभागीय समिती जिल्हात

## समिती प्रमुख माणिकराव ठाकरे यांच्या नेतृत्वात पाहणी

### दौऱ्यात खासदार बळवंत वानखडे यांचेसह बबलू देशमुख, वीरेंद्र जगताप यांचाही सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,**

अमरावती जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आज समिती प्रमुख .माणिकराव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील समितीचा दौरा पार पडला. सकाळी १० वाजता समितीचे प्रमुख व सदस्य अमरावती येथील शासकीय विश्रामगृहात दाखल झाले.



यानंतर सकाळी ११ वाजता अंतोरा येथील शेतकरी नामदेवराव शामराव पाटील व दिवाकर ससाणे यांच्या शेतातील नुकसानीची पाहणी करण्यात आली. त्यानंतर ११:३० वाजता समितीने दिलीपराव सोनोने यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी संवाद साधला.या पाहणी दौऱ्यात समिती प्रमुख माणिकराव ठाकरे, खासदार बळवंतराव वानखडे,जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख,माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप, हरिभाऊ मोहोड, तसेच प्रकाशराव काळबांडे,प्रवीण मनोहर,संजय नागोणे,अमितराव गावंडे,श्रीकांतराव बोंडे, वीरेंद्र जाधव,शैलेशराव काळबांडे, शाम देशमुख, गजानन राठोड, पंकज देशमुख,दिलीपराव सोनोने, विश्वभर निचित, प्रमोद राणे,गजानन देशमुख, विकास गायकवाड, प्रमोद तसरे,मनोज अंबाडकर,प्रशांत पाटील,शैलेश दुपारे, नरेंद्र बारबुदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समिती सदस्यांनी शेतकऱ्यांची आस्थेने चौकशी केली, पिकांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून त्यांना धीर दिला. शासनाकडून शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे, हेक्टरी शेतकऱ्यांना ५० हजार रुपये नुकसान भरपाईची मागणी देखील यावेळी काँग्रेसकडून शासनाकडे केली जाणार आहे ,शासनाने याची दखल न घेतल्यास आम्ही रस्त्यावर उतरून लढा देण्यास तयार आहोत, असा इशारा खासदार बळवंतराव वानखेडे व जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी यावेळी दिला.या दौऱ्यामुळे अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये दिलासा निर्माण झाला असून शासनाने योग्य त्या पातळीवर त्वरीत मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## चंद्रशेखर भोयर यांच्या पाठपुराव्याला यश

# मागणीमान्य राज्यातील शिक्षकांना मिळणार आरोग्य कवच

### धर्मवीर आनंद दिघे कॅशलेस शिक्षक कुटुंब आरोग्य कवच योजनेला तत्वतः मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** राज्य सरकारने राज्यातील शिक्षकांना आरोग्य कवच प्रदान करण्याचा निर्णय घेतला असून लवकरच धर्मवीर आनंद दिघे कॅशलेस शिक्षक



कुटुंब आरोग्य कवच योजना राज्यभरात लागू होणार आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत आरोग्य विभागाने या योजनेस तत्त्वतः मान्यता दिली असून, यासाठी उच्चस्तरीय समितीही स्थापन करण्यात आली आहे. शिक्षकांसाठी कॅशलेस योजना लागू व्हावी यासाठी शिक्षक महासंघाचे अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करून या मागणी संदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश येऊन मागणी मान्य झाल्याने राज्यातील शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.शिक्षकांना कॅशलेस आरोग्य कवच देणाऱ्या या योजनेचा आराखडा आणि निकष निश्चित करण्यासाठी राज्य सरकारकडून विशेष समिती गठीत करण्यात आली आहे.या समितीचे नेतृत्व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे करतील, तर महात्मा ज्योतिबा फुले योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण आणि उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख आरोग्यदूत मंगेश चिवटे, शिक्षक संघटनेचे प्रतिनिधी म्हणून प्रा. डॉ. बापूसाहेब अडसूळ, प्रा. सुभाष मोरे यांसह उच्चपदस्थ अधिकारी या समितीत सहभागी असणार आहेत. समिती पुढील तीन ते चार महिन्यांत राज्यभरातील शिक्षक प्रतिनिधींना भेटून, आरोग्य कवच योजनेचे सर्व अंग सखोलपणे ठरवेल. या योजनेअंतर्गत शिक्षकांना व त्यांच्या कुटुंबांना मोफत शस्त्रक्रिया, उपचार व आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत, असे चंद्रशेखर भोयर यांनी सांगितले.शिक्षक बांधवांसाठी या कॅशलेस आरोग्य कवच योजनेला राज्य सरकारकडून तत्त्वतः मान्यता मिळाल्याने शिक्षक महासंघाचे अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर आणि संघटनेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे विशेष आभार मानले आहे.

### सर्व शिक्षकांना लाभ मिळणार

भोयरआतापर्यंत केवळ पूर्ण अनुदानित शाळांमधील शिक्षकांनाच वैद्यकीय प्रतिपूर्तीचा लाभ मिळत होता. मात्र अंशदानित शिक्षक या लाभांपासून वंचित होते. शिक्षक संघटनांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर सरकारने हे सकारात्मक पाऊल उचलले आहे. आगामी तीन ते चार महिन्यात या योजनेचा अंतिम मसुदा तयार होणार असून लवकरच ही योजना लागू होणार आहे. या योजनेमुळे शिक्षकांना आर्थिक दिलासा मिळणार असून वेळेची बचत होईल तसेच सर्वांना समान लाभ मिळणार असल्याचे चंद्रशेखर भोयर यांनी सांगितले.

### शिक्षकांना कसा होणार आर्थिक फायदा?

उपचाराचा खर्च थेट शासन किंवा विमा कंपनीमार्फत रुग्णालयाला दिला जाईल.वेळेची बचत : वैद्यकीय बिलांच्या मंजुरीसाठी सरकारी कार्यालयांमध्ये फेऱ्या मारण्याची गरज नाही.तणावमुक्ती : आजारपणात आर्थिक चिंतेऐवजी उपचारावर लक्ष केंद्रित करता येईल.सर्वांसाठी समान लाभ : अनुदानित, अंशदानित असा भेद न राहता सर्व शिक्षकांना आरोग्य सुरक्षा मिळेल.–

# सुकळीच्या शाळेने पथनाट्यातून दिला प्लास्टिक मुक्तीचा संदेश!

## स्वच्छता पंधरवाडा, विविध उपक्रमाचे आयोजन विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी घेतली स्वच्छतेची शपथ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,**

स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत सुकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या स्वच्छता संदेशाच्या घोषणानी सारा आसमंत दुमदूमला. दरम्यान, गावातील प्रमुख चौकात विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे उत्कृष्ट सादरीकरण करून प्लास्टिक मुक्तीचा संदेश दिला. यावेळी नागरिकांना स्वच्छता व प्लास्टिक मुक्तीची शपथ देण्यात आली. १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान स्वच्छता पंधरवाडाचे आयोजन करण्यात आले असून शाळेत विविध उपक्रम राबविले जात आहे. शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत राज्यातील शाळांत १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान स्वच्छता पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे. त्यानुसार सुकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने शनिवारी (ता. २७ ) गावातून स्वच्छताविषयी जनजागृतीसाठी रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या स्वच्छता संदेशाच्या घोषणानी सारा आसमंत दुमदूमला





होता. रॅलीतील विद्यार्थ्यांच्या हातातील स्वच्छता व प्लास्टिक मुक्तीच्या घोषनांचे फलक लक्ष वेधून घेत होते. चिमुकल्यांची राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगेबाबा यांची वेशभूषा लक्षवेधी ठरली. दरम्यान, गावातील प्रमुख चौकात विद्यार्थ्यांनी विविध पथनाट्याचे उत्कृष्ट सादरीकरण करून प्लास्टिक मुक्तीचा संदेश दिला. यावेळी पथनाट्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांच्या कलेची प्रशंसा करीत नागरिकांनादेखील यावेळी स्वच्छता व प्लास्टिक मुक्तीची शपथ घेतली. १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान स्वच्छता पंधरवाडाचे आयोजन करण्यात आले असून शाळेत स्वच्छता पंधरवढ्याच्या दिनदर्शिकेनुसार प्रत्येक दिवशी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार पहिला दिवस विद्यार्थी व शिक्षक यांना स्वच्छतेची शपथ दिवस म्हणून पाळला. त्यानंतर स्वच्छता जनजागृती दिवस, ग्रीन स्कुल दिन, समुदाय परिसरातील भेट दिवस, हात धुणे दिवस, स्वच्छता सहभाग दिन, वैयक्तिक स्वच्छता दिन, स्वच्छता शाळा प्रदर्शन दिन, स्वच्छता कृती आराखडा दिवस आदी उपक्रम घेण्यात आले. मंगळवारी (दि. ३०) पारितोषिक वितरण दिनाने या पंधरवाढ्याची सांगता होणार आहे. यावेळी स्वच्छता रॅलीत सरपंच राजूभाऊ गजभिये, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुणवंत बोरकर यांच्यासह नागरिक, विद्यार्थी व शिक्षक यांनी उपस्थिती दर्शवून सहभाग नोंदविला. स्वच्छता पंधरवाडा यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी संदिप बोडखे यांच्या आदेशानुसार उच्च श्रेणी मुख्याध्यापक निखिल सवाई यांच्या मार्गदर्शनात शिक्षक गणेश ठाकरे, शकीला पटेल, सविता शिरभाते, सारिका शिरपूरे, रुपाली सोनखासकर, ज्योत्स्ना गुल्हाने, रश्मी खाडे, संजय थोरात, विनायक लकडे, सारिका काळे यांच्यासह शालेय पोषण आहार कर्मचारी शिला बाहेकर, जया राऊत व आशा बोरकर हे परिश्रम घेत आहे.

# जिल्ह्यातील ६.७७ लाख हेक्टरवरील पिके 'कोमात'

## २.४६ लाख हेक्टरवरील सोयाबीन संकटात२.८६ लाख हेक्टरवरील कापसाची वाढ खुंटली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती** गेल्या महिनाभरापासून हातपाय धुवून मागे लागलेल्या पावसाने आता शेतकऱ्यांच्य नाकीनऊ आणले. दिवस निघाला की देदणका... धुव्वाधार, कुठे मुसळधार पावसाच्या हजेरीने जिल्ह्यातील चौदाही तालुक्यातील शेतकरी आता रडकुंडीला आला असून हवालदिल झाला आहे. त्यामुळे आधीच विविध रोगाचे आक्रमण झालेले जिल्ह्यात सुमारे ६.७७ लाख हेक्टरवरील खरीप पिके आता जणू 'कोमात' गेल्याचे चित्र आहे. कारण २.४६ लाख हेक्टरवरील सोयाबीन अतिपावसाने संकटात सापडले असून कुठे पिवळेझालेतर कुठे शेंगा भरण्यापूर्वी मरणासन्न स्थितीत आहे. दुसरीकडे २.८६ लाख हेक्टरवरील कापसाची वाढ खुंटली, अतीपावसामुळे फुले – पाती बेपत्ता झाली आणि १.२० लाख हेक्टरवरील तुरीचे पीक कुठे जळाले, तर कुठे पिवळे पडले. त्यामुळे आता करावेतरी काय ? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.



यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्यातील एकूण ६ लाख ८२ हजार हेक्टरपैकी ६ लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्रात प्रत्यक्ष पेरणी करण्यात आली. सोयाबीन, कापूस, तूरयामुख्यपिकांसह मूग, उडीद, ज्वारी व मका आदी पिकांखाली क्षेत्र आहे. विशेष म्हणजे कपाशीच्या क्षेत्रात यंदा वाढ झाली. यावर्षी २.६८ लाख हेक्टरवर कापसाचे पीक आहे. तर सोयाबीनचे क्षेत्र २.४६ लाख हेक्टर एवढे आहे. मात्र यंदा ऑगस्टनंतर सप्टेंबर महिन्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. अधिक पाऊस सरासरीहून कोसळल्यामुळे शहरातील नागरिकांसह शेतकऱ्यांच्या सुद्धा आता नाकीनऊ आले आहे. सप्टेंबर महिन्यात सलग पाऊस कोसळत आहे. अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान होत आहे.हवामान खात्याच्या ताज्या अंदाजानुसार, राज्यातूनमान्सूनचानिरोप किमान ३० सप्टेंबरपर्यंत तरी होण्याची शक्यता नाही. त्यामुळे पावसाचा अनियमित पण जोरदार प्रभाव पुढील काही दिवस कायम राहणार असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

# अचलपूर पोलिसांची मोठी कारवाई

## ५६ वाहने जप्त, ३० हजारांचा आकारला दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अचलपूर–** शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी अचलपूर पोलिसांनी मोठी मोहीम राबवत ५६ वाहने जप्त केली. कागदपत्रे अपुरी, परवाना व विमा नसणे, अल्पवयीन चालकांकडून वाहने चालवली जाणे आणि वेगमर्यादा ओलांडणे यांसारख्या गंभीर उल्लंघनांवर ही कारवाई करण्यात आली.



या मोहिमेत ४६ मोटारसायकलींवर २३,५०० रुपये, तर ११ चारचाकी वाहनांवर ६,३०० रुपये असा एकूण ३०,१०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. दंड भरल्यानंतर वाहने सोडण्यात आली.

ही मोहीम अचलपूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार गजानन म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जमील खान, अमर सिंग जांभेकर, रविंद्र अंबाळकर, अतीक शेख, विशाल पोळ व अन्य कर्मचाऱ्यांनी केली.शहरात अनेक अल्पवयीन युवक परवाना व कागदपत्रांशिवाय मोठ्या वेगाने वाहन चालवतात. त्यामुळे अपघाताची शक्यता वाढते. काही जण तर सायलेंसर काढून मोठ्या आवाजात वाहने चालवतात. अशा बेफिकीर वाहनचालकांवर पुढेही कठोर कारवाई सुरू राहील.

पोलिस विभागाने शहरवासीयांना आवाहन केले आहे की १८ वर्षांखालील मुलांना वाहन देऊ नये. सर्वांनी आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत.वाहतूक नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर दंडाची तयारी ठेवावी.

# उद्घाटनाआधीच दर्यापूर नवीन बस डेपो गळायला लागला

## भिंतींमधून पाझर, परिसरात कचऱ्याचे साम्राज्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९दर्यापूर**

करोडो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या नवीन बस डेपोचे काम अद्याप पूर्ण झालेले नसतानाच निकृष्ट बांधकामाचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी, उद्घाटनाआधीच डेपोच्या भिंतींमधून पाण्याचा पाझर दिसून आला असून अनेक ठिकाणी गळती सुरू आहे.

ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे व डेपो मॅनेजर बाऊलकर यांचे दुर्लक्ष यामुळे हे काम दर्जाहीन झाल्याची टीका नागरिकांतून होत आहे. बाऊलकर हे स्थानिक असूनही त्यांनी या कामाकडे गावाचे म्हणून लक्ष न दिल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे.डेपोच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून कोणत्यातरी प्लांटचे (सीएनजी अथवा इलेक्ट्रिक) बांधकाम सुरू आहे, मात्र त्यासमोरील संपूर्ण भाग घाणीने भरलेला आहे. कचऱ्याचा ढीग, वाढलेले गवत व बेफिकीर वातावरण यामुळे संपूर्ण डेपो परिसर अप्रेमाणिक



अवस्थेत आहे.यापूर्वी खासदार बळवंत वानखडे यांनीही डेपो मॅनेजरला सूचना दिल्या होत्या, पण त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. राहण्याच्या कार्टर्सचीही अवस्था दयनीय असून पुन्हा अडगळीत जात असल्याचे दिसून येते.दर्यापूर तालुका मनसेचे प्रमुख मनोज पाटील तायडे यांनी एकदा परिसर स्वच्छ करून नवीन कुलूप लावून दिले होते, मात्र काही दिवसांतच पूर्वीची अवस्था परत आली. त्यांनी आता पुन्हा लक्ष देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

# नवनीत राणा यांचा शेतकऱ्यांच्या बांधावर दौरा

## ओला दुष्काळ जाहीर करून दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई द्या – राज्य सरकारला मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९अमरावती** संपूर्ण अमरावती जिल्ह्यात गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतातील कापूस, सोयाबीन, ज्वारी, संत्री आदी पिकांचे अतोनात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या नेत्या व स्टार प्रचारक मा.खासदार सौ. नवनीत राणा यांनी दर्यापूर व अंजनगाव सुर्जी तालुक्यातील गावागावांत जाऊन बांधावरून नुकसानीची पाहणी केली.



पाहणीदरम्यान, त्यांनी राज्याचे कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे व अमरावती जिल्हाधिकारी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून अमरावती जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा व सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई द्यावी, अशी स्पष्ट मागणी केली.खासदार नवनीत राणा यांनी सांगितले की, आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यांनी मेहनतीने पेरणी केली होती, पण अतीवृष्टीमुळे शेतकऱ्यांचा सर्व आशेचा किरण नष्ट झाला आहे. शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक उद्धवस्त झाल्यामुळे त्यांचा दिवाळीसारखा मोठा सणही संकटात सापडला आहे.यावेळी त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली की, शेतकऱ्यांना शक्य तितकी जास्तीत जास्त नुकसान भरपाई लवकरात लवकर मिळावी.या पाहणी दौऱ्यात दर्यापूर तालुक्यातील आमला, थिलोरी, माऊली, खल्लार, कोकर्डा, लेहगाव, सामदा, सांगळुद, सासन, सागंवा, चिचोंली, चिचोंरी रहिमापुर तसेच अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव, गावंडगाव, काळगव्हाण, हिंगणी, चिचोली, टाकरखेड, धनेगाव, पांढरी, कापूस तळणी, हंतोडा, विहीगाव, दहीगाव रेचा, लखाळ, भंडारज, कोकर्डा इत्यादी गावांचा समावेश होता.–

## उदो ग अंबे उदोचा गजर...

# पिंगळादेवीच्या गडावर आज अंबादेवीची खापरी

## तप्त मडके घेऊन प्रदक्षिणा

### विदर्भासह परप्रांतीय भक्तांची गर्दी उसळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ नेरपिंगलाई–** मातीच्या मडक्याला शुद्ध करून अग्निदेवताला साक्षी ठेऊन





पिगळादेवी सामग्रीचे हवन आणि होमहवनाने लाल तप्त झालेले मडके म्हणजे खापरी. ही खापरी बघण्याची विदर्भवासीयांना उत्सुकता लागली आहे. अंगावर शहारे आणणारा भक्तांना आश्चर्यचकीत करणारा असा हा सोहळा आहे. लालबुंद खापरी ब्राम्हण पुजारी तळहातावर, डोक्यावर घेऊन सुसाट वेगाने देवीला प्रदक्षिणा लावतो. तळहाताला, डोक्याला कुठलीच इजा होत नाही. ही खापरी आज सोमवार २९ सप्टेंबरला सप्तमीसह अष्टमीला रात्री १२ वाजता उचलली जाणार आहे.

दोनशे वर्षाच्या परंपरेनुसार खापरीचा कार्यक्रम होत आहे. ब्राम्हण पुजारी नारायणराव शंकरराव मारुडकर हे कुटुंबासह नवरात्र महोत्सवात पिगळादेवीची पूजाअर्चा श्रृंगारासाठी व आराधनेसाठी दाखल झाले आहेत. ७५ वर्षीय नारायणराव मारूडकर वयाच्या चौदाव्या वर्षीपासून खापरी उचलत आहे. परंतु आता त्यांचे सुपुत्र महेश नारायणराव मारूडकर यांना खापरी उचलण्याचा मान मिळाला आहे. भक्तांचे दुःख दूर व्हावे, त्यांच्यावरील संकट टळावे, देवीचा आशिर्वाद भक्तांवर राहावा, याकरिता खापरी मध्ये होमहवन करून

देवी प्रसन्न व्हावी यासाठीच केली जाते. आतमध्येआतमध्ये कापूराचा दीप अग्निदेवतेला साक्षी मानूनप्रज्वलित केला जातो. सप्तशक्तीचापाठहोतो सोळा प्रकारच्या सामग्रीचे हवन सोबतच तुपाची आहुती दिली जाते. चार तासापेक्षा जास्तवेळ हवन होत असल्याने मडके लालबंद होते. या पात्रालाच अंबादेवीची खापरी म्हटले जाते. ही खापरी महेश मारुडकर तळहातावर किवा डोक्यावर घेतात. त्यावेळी त्यांच्यासमोर त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती पेटती मशाल घेऊन चालतात. ढोल, टाळांच्या गजरात सुसाट वेगाने देवीच्या मंदिराला पाच किवा अकरा प्रदक्षिणा घातल्या जातात. अंगावर शहारे आणणारा हा प्रकार असला तरी नारायणराव व त्यांचे सुपुत्र महेश यांना आजपर्यंत कुठलीच इजा झाली नाही. देवीची शक्तीच त्यांच्या साथीला राहते, असा भाविकांचा विश्वास आहे.

# चांदूर रेल्वे तालुक्यात अतीवृष्टी, १९ हजारावर शेतकरी बाधित

## शेतकऱ्यांसाठी १३ कोटी ४३ लाखांची मदत,आ.प्रतापदादा अडसड यांच्या पाठपुराव्याला यश


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदुर रेल्वे –** राज्यात जून ते ऑगस्ट या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानी पोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी नुकतीच शासनस्तरावरून मदत जाहीर झाली आहे. यातचांदूर रेल्वे तालुक्यासाठी एकूण १३ कोटी ४३ लाख ९१ हजार ६३० रुपयाची मदत प्राप्त झाली आहे. प्रति हेक्टर साडे आठ हजार रुपयाप्रमाणे चांदूर रेल्वे तालुक्यासाठी एकूण १३ कोटी ४३ लाख ९१ हजार ६३० रुपयाची मदत प्राप्त झालीआहे. प्रति हेक्टर साडे आठ हजार रुपयाप्रमाणे लवकरच तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.तालुक्यात सुरवातीला समाधान कारक पाऊस सुरू असतांना पीक ऐनबहरत असतांना ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यातअतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचेस्वप्नपावसात वाहून गेले. उरले सुरले पीक आता कापणीला आले असतांना पुन्हा पावसाचा जोर वाढल्याने तेही हातचेनिसटले आहे, राज्यभर शेतकऱ्यांच्या आक्रोश पाहता शासनाने लगेचमदतघोषित केली आहे. त्यानुसार दसऱ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या खात्यात ही मदत पोहचणार असल्याची माहिती आहे. तालुक्यात एकूण १९हजार पाचशे दहा इतके शेतकरी अतिवृष्टी बाधित झाले असून शेतीचे क्षेत्रफळ १५ हजार ८१० असे आहे. तालुक्यातील सातेफळ, पळसखेड, घुईखेड, चांदूर रेल्वे, व आमला विश्वेश्वर हे पाचही मंडळे अतिवृष्टी धारक असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात ही मदत पोहचणार असल्याचे तहसील कार्यालयातून माहिती मिळाली आहे.



### सर्वाधिक फटका आमला विश्वेश्वर मंडळाला

येथे कापूस पिकाचे १६४२ हेक्टर, तुरीचे ५०० हेक्टर नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका सोयाबीन पिकाला बसला. त्याचे क्षेत्रफळ १३ हजार ६६८ इतका आहे. सर्वाधिक फटका आमला विश्वेश्वर मंडळात बसला असून त्या पाठोपाठ चांदूर रेल्वे मंडळाला बसला आहे.

### आ. अडसड यांच्या प्रयत्नांना यश



अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहेत. आ. प्रताप अडसड यांनी याबाबत मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरवठा केला होता व त्यालाच यश आले आहे. पुढे येणारे सण-उत्सव पाहता तातडीने शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे होते. तेच पाहून शासनाने तातडीने मदत जाहीर केली असून लवकरच ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. यासाठी आम्ही आमदार प्रताप अडसड आणि मुख्यमंत्री यांचे आभार मानतो.

**विवेक चौधरी, (तालुकाध्यक्ष भाजप**

### तळेगाव ठाकूर येथील ग्रामपंचायत व शेतकर्यांच्या तहसीलदार यांना निवेदन सादर

## सार्सी रस्ता तसेच पिंगलाई नदीवरील पुलाचा चा लवकर प्रश्न मार्गी लावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९तिवसा –** तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर येथील शेतकरी व ग्रामपंचायत कार्यालय तर्फे तिवसा तहसीदार मयूर कळसे यांना निवेदन सादर केले.तळेगाव ठाकुर ते सार्सी पांदण रस्त्याचे काम गेल्या काही वर्षांत पासून रखडले असून त्यागावातील शेतकरी यांना पिकाचे खत टाकणे,पिके कापणी व काढणी करण्याकरीता शेतकर्यांना त्रासदायक समस्या निर्माण होत आहे.तळेगाव ठाकूर सार्सी हा रस्ता मुख्यमंत्री



ग्रामसडक योजना अतर्गत डी पी सी वर्ष २३-२३ मंजूर असून त्यात ऐकून ४. ७०कीं. मी. लांबी असून रपटे व पूल ३१ नग असा उल्लेख आहे. तरी सदर रस्ता झाला असून अध्यापपर्यंत पुलाचे कुठलेही काम लागलेले नसून यामुळे नदीला खूप मोठ्या प्रमाणात पूर येत असल्यामुळे शेतकर्यांना आपल्या शेतात ये- जा करता येत नसून मंजूर असलेले काम देखील अद्याप का लागले नाही अशी गावात सर्वत्र चर्चा होऊन शेतकर्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे तरी विनंती की सदर काम तातडीने लावण्याचे करावे याकरीता उपस्थित शेतकरी ग्रामस्थ नागरिक सरपंच सौ. दर्शना मारबदे, श्री. दीपक राव बेलसरे, श्री. शरद भाऊ खवले, श्री.नंदू भाऊ मारबदे,श्री. अमोल पन्नासे, अनिकेत बादसे, दादारावजी घोरमाडे,श्री.मंगेश राऊत, विनोद भाऊ डेहनकर, श्री. अनिल भाऊ आढाव, वैभव ठाकूर. उपस्थित होते.

## नवसाला पावणारी तळेगाव ठाकूरची कुलस्वामिनी श्री रेणुका माता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ तिवसा**

अमरावती व नागपूर रोड असलेले तिवसा तालुक्यातील वंदनीय राष्ट्रांत तुकोजी महाराज यांच्या समाधीस्थळ गुरुकूज मोझरी पासून ३ कि. मी अंतर असलेले पंचकोशीतील आदिशक्ती माँ रेणुका देवीचे जागृत आणि प्रसिद्ध असलेले पुरातन मंदिर तळेगाव ठाकूर येथे आहे. या मंदिराची ख्याती फार पुरातन स्वरूपाची आहे. मंदिरातील श्री रेणुका देवीचा इतिहास पाहता असे लक्षात येते की देवीचे जागृत स्थान आहे. तळेगाव ठाकूरची कुलस्वामिनी श्री रेणुका माता ही भक्ताच्या नवसाला पावणारी अशी या मंदिराची ख्याती आहे. या मंदिरात भक्तमंडळी ही दूरदूरून मातेच्या दर्शनासाठी येत असल्यामुळे मंदिर परिसर गर्दीने फुलला असतो. अमरावती जिल्ह्यातील मुख अशा आध्यात्मिक आणि पुरातन असे श्री रेणुका माताचे मंदिर तळेगाव ठाकूरला आहे. मंदिराचा परिसर स्वच्छ व मनमोहक अशा की मनाला प्रफुलित करणारा आहे. मंदिरात परिसरात प्रथमदर्शनी दिसणारे विठ्ठल रुख्मिणीचे पूर्वाभिमुख मंदिर, राम मंदिर, उचटेकडीवरील श्री दत्त मंदिर, पुरातन असे असलेले श्री हरिहर मंदिर, श्री जगदीश महाराज मंदिर, पुरातन मस्ताराम बाबाची धुणी आणि पुरातन आखला याचा




अदभुत संगम दिसून येतो. पिंगळाई नदीच्या काठावर असलेले सर्व मंदिरा सोबत श्री रेणुका माता पुर्वामुख असुन सूर्योदयाचे प्रथम किरण मंदिराच्या गाभाऱ्यात पडताना दिसते. मंदिराचा भाग मनमोहक असून पिंगळाई नदी आणि निसर्ग दृश्य अधिक मनमोहक दिसतो. तळेगाव ठाकूर येथील श्री रेणुका देवीचा इतिहास हा ७०० ते ८०० वर्षे पुरातन असा आहे. प्रारंभी सुपारी एवढी असणारी देवीची कणाकणाने वाढ होवून आज तिने भव्य स्वरूप धारण केले आहे. नवरात्रच्या दिवसामध्ये या मंदिरात जल्लोषाचे वातावरण निर्माण होत असते. अखंड जप-तप , गोधळ, सप्तशती पाठ , भजन-किर्तन, होम- हवन महापूजा, आरती प्रार्थना याचा खासमेळ दिसून येतो. या मंदिरात भक्तमंडळी मोठ्या संख्येने रोज उपस्थिती दिसते. या श्री रेणुका माता मंदिराची सर्व जबाबदारी श्री अशोक भारती महाराज यांच्याकडे आहे.

# मेळघाटात १२ रुग्णवाहिका बंद

## दुरुस्तीअभावी रुग्णांना जीव मुठीत धरून प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मेळघाट–** अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील १२ रुग्णवाहिका दुरुस्तीअभावी बंद अवस्थेत आहेत. यामुळे विशेषतः मेळघाटातील रुग्णांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शासनादेशातील तरतुदींच्या अभावामुळे या रुग्णवाहिका रस्त्यावर आणण्यात अडचणी येत आहेत.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये सध्या २०० हून अधिक रुग्णवाहिका कार्यरत आहेत. यापैकी सुमारे १२ वाहने नादुरुस्त झाल्याने बंद आहेत. यातील बहुतांश रुग्णवाहिका मेळघाटमधील असल्याने तेथील दुर्गम भागातील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळत नाही. सेमाडोह येथील आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका टायर खराब झाल्यामुळे गेल्या महिन्याभरापासून बंद आहे, अशीच स्थिती इतर अनेक गावांमध्येही आहे.शासनाने नवीन रुग्णवाहिका खरेदीसाठी जिल्हा परिषदेला डीपीसीतून ३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र, एकूण तरतुदीपैकी २० टक्के रक्कम दुरुस्तीवर खर्च करण्याची मुभा



जिल्हा शल्य चिकित्सकांना (उड) दिली असली तरी, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना (ऊक्ज) तशी मुभा देण्यात आलेली नाही. यामुळे नादुरुस्त वाहनांची दुरुस्ती रखडली आहे.

या अडचणीमुळे जिल्हा परिषद प्रशासनाने सदर शासन निर्णयात सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाकडे मागणी केली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यापुढेही हा मुद्दा मांडला. पालकमंत्र्यांनी यावर सकारात्मकता दर्शविली असून, लवकरच शासनादेशात बदल केला जाईल, असे संकेत दिले आहेत.

जिल्हा परिषदेमार्फत ३४१ आरोग्य उपकेंद्र, ६५ आयुर्वेदिक दवाखाने, ५९ प्राथमिक आरोग्य केंद्र, आठ ग्रामीण रुग्णालये आणि सहा उपजिल्हा रुग्णालये चालवली जातात. गरोदर माता आणि बालकांसाठी १०२ क्रमांकाने १४० रुग्णवाहिका सेवा देतात, तर इतर रुग्णांसाठी १०८ क्रमांकाने सेवा उपलब्ध आहे. याशिवाय, पूर्वी पुरवलेल्या सुमारे ८० रुग्णवाहिका विशेषतः मेळघाटात धावतात. मेळघाटातील खराब रस्ते आणि पावसाळ्यामुळे वाहने वारंवार नादुरुस्त होतात, ज्यामुळे नियमित दुरुस्ती आवश्यक ठरते. मात्र, निधीच्या तरतुदीअभावी प्रशासनासमोर अडचणी उभ्या ठाकल्या आहेत.

## नविन अभ्यासिका इमारत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी खुली करा

### राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.गट) नेते मो.फहीमोददीन यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अंजनगाव सुर्जी**

उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ चाकरी' अशी म्हण जुन्या काळी प्रचलित होती. आता चाकरी उत्तम समजली जाते. मुलाने पदवी मिळविली की, दरमहा वेतन देणारी लहान-मोठी नोकरी धरावी अशी सर्वांची अपेक्षा असते. अगदी वधू पित्यालाही जमीन जुमलावाला नव्हे तर आता नोकरदार जावई हवा आहे. दरमहा हमखास उत्पन्न असणे, हा व्यवहार्य दृष्टिकोन त्यामागे आहे.अंजनगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मो. फहीमोददीन यांनी समाजातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शहरातील अब्दुल्लाह नगरात नवीन बांधकाम झालेली अभ्यासिका इमारत स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करण्यासाठी तालुक्यातील व शहरातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी खुली करून देण्यासाठी नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.अंजनगाव शहरात व शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागात अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी हक्काची अभ्यासिका नाही. सध्याचे वातावरण पाहता अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांन कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी हल्ली स्पर्धा परीक्षे कडे वढत असताना अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करण्यासाठी कुठलेही प्रशासनाने व्यवस्था केलेली नाही. ज्या अभ्यासिका आमदार निधीतून बांधण्यात आल्या आहेत त्या अजुनही बंद अवस्थेत आहेत. शहरातील अब्दुल्लाह नगरातील अभ्यासिका इमारत स्पर्धा परीक्षेसाठी खुली करून दिल्यास नगरातील व आजूबाजूच्या परिसरातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करण्यासाठी सुविधा उपलब्ध होईल व विद्यार्थाना भविष्य घडविण्यात मदत हाच उद्देश आहे. असे निवेदनाद्वारे



राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे नेते मो फहीमोददीन यांनी नगरपरिषद प्रशासनाला निवेदनातून केला आहे. यावेळी अफसर बेग, डॉ अब्दुल राजिक, डॉ एजाजोददी, नाजिम खतिम,मो.वाजिद उपस्थित होते.

# विद्यापीठ स्तरीय विद्यार्थी संशोधन संमेलनात पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयास प्रथम पारितोषिक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ अमरावती –** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, संशोधन सल्लागार समिती (ठ-उ) अंतर्गत गुणवंत आश्वासन कक्ष (खट-उ) आणि नव संशोधन व नवोपक्रम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवसंशोधन २०२५ विद्यापीठ स्तरीय विद्यार्थी संशोधन संमेलन मध्ये पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यायाने प्रथम पारितोषिक पटकावले.

विकसित आणि स्वावलंबी भारताच्या उद्दिष्टांसाठी तरुण पिढीला वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रात सक्षम बनवण्यासाठी विज्ञान प्रदर्शनी महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी आयोजित केलेल्या या संमेलनात पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील द्वितीय वर्षातील ओम सोनार, प्रथमेश मारोतकर व पवन कराळे या विद्यार्थ्यांनी एकात्मिक शेती पद्धती मध्ये नैसर्गिक शेतीचे महत्व व मातीचे आरोग्य संवर्धन या विषयावर प्रतिकृती सादर करून सहभाग नोंदविला. एकात्मिक शेती पद्धतीत विविध शेतीपूरक घटक पशुपालन, मत्स्य पालन, कुकुट पालन , रेशीम उद्योग व फुलशेती इ. चा समन्वय साधला. सदर प्रतिकृती कृषी विद्या विभागाअंतर्गत तयार करण्यात आली. यामध्ये एका घटकातील टाकाऊ पदार्थ दुसऱ्या घटकासाठी 'निविष्ठा' म्हणून वापरले जातात. ज्यामुळे घनकचरा कमी होतो , संसाधनाचा पुनर्वापर होतो आणि शेतकऱ्यांना वर्षभर आर्थिक उत्पन्न मिळत राहते. नैसर्गिक शेती पर्यावरणास अनुकूल आहे व मातीच्या आरोग्याचे संवर्धन करत असून, शाश्वत विकासाला चालना देते असे स्पष्टीकरण विद्यार्थ्यांनी प्रकल्पासंदर्भात दिले. सदर संमेलनामध्ये ५० पेक्षा अधिक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.पी आर पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रतिकृती व सादरीकरणासाठी अकरा हजार रोख रक्कम व मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.सदर प्रतिकृतीस संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मिलिंद बारहाते व श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील संशोधन स्पर्धेचे मुख्य आयोजक व प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यांनी भेट देऊन कौतुक केले. कृषी विद्या विभागाचे प्रा. श्री हेमंतकुमार पवार व प्रा. श्वेता गणवीर यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी प्रकल्पाची प्रतिकृती बनवून सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या या यशाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे व उपप्राचार्य श्री नितेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.–



# शेगावच्या गजानन महाराज संस्थानचा पूरग्रस्तांना महादानी हात

## सीएम निधीस १ कोटी११ लाखांचे योगदान : धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कडे सुपूर्त





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९शेगाव**

विदर्भ पंढरी म्हणून संपूर्ण राज्यात ख्यातीप्राप्त असलेले शेगाव येथील संत गजानन महाराज संस्थांनाने अध्यात्म, संस्कृती जोपसाण्याचे काम अव्याहत जोपासले आहे. तसेच वारकरी, भक्तसेवेची मौलिक परंपरा देखील जपली आहे. गजानन माऊली भक्ताच्या संकटात धावून येतात ही लाखो भाविकांची श्रद्धा आहे.

हीच परंपरा संत गजानन महाराज संस्थान अर्थात विश्वस्त मंडळाने देखील जोपासली आहे. सध्या राज्यातील लाखो शेतकरी नागरिक, भाविक अतिवृष्टी, महापूराने संकटात सापडली आहे. यावर्षी महाराष्ट्रात पावसाने अक्षरशः थैमान घालत अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण केली. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. शासनाने पुरग्रस्तांना मदतीचे आवाहन केले आहे. या सर्वांच्या घोर संकटात त्याच्या मदतीसाठी गजानन महाराज संस्थानाने धाव घेतली आहे. शेगावचे आध्यात्मिक व सामाजिक प्रेरणास्थान असलेल्या संत गजानन महाराज संस्थानने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस तब्बल १ कोटी ११ लाख रुपयांची मदत दिली आहे. हा धनादेश २७ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुपूर्द करण्यात आला आहे. श्री संत गजानन महाराज संस्थान हे केवळ धार्मिक कार्यापुरते मर्यादित नसून, सेवाभावी व समाजोपयोगी उपक्रमात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. संस्थानचे अन्नछत्र, शिक्षणक्षेत्रातील योगदान, आरोग्यसेवा, जलपुरवठा योजना आणि आपत्ती व्यवस्थापनातील सहकार्य या सर्व कार्याचा देशभरातून गौरव होत आहे. यापूर्वीही दुष्काळ व पूरस्थितीत संस्थानने शासनाला भरीव मदत दिली होती.श्री गजानन महाराजांचा संदेश हा भक्ती, सेवा आणि समर्पणाचा आहे. त्याच धर्तीवर संस्थानने संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जात सेवा हाच धर्म हा बोध प्रत्यक्ष कृतीत उतरवला आहे. या भरीव योगदानामुळे पुरग्रस्तांना दिलासा मिळणार असून, समाजात सेवाभावी व स्वच्छतेच्या कार्यात आघाडी घेणारे संस्थान हे खरेच प्रेरणास्थान ठरले आहे.अध्यात्मिकच नव्हेतर स्वच्छतेचीही राजधानी विशेष म्हणजे, स्वच्छतेच्या बाबतीत श्री संत गजानन महाराज संस्थान देशात क्रमांक एकचे मानले जाते. संस्थान परिसरातील स्वच्छता, सुव्यवस्था आणि हरिताई याचे अनुकरण देशभरातील विविध संस्था करतात. येथे येणारा भाविक स्वच्छता, शिस्त आणि शांततेचा अनुभव घेतो. त्यामुळेच संत नगरी शेगाव ही केवळ अध्यात्मिक नाही तर स्वच्छतेचीही राजधानी मानली जाते.

# चंद्रभागा प्रकल्पामुळे शेतकरी आक्रमक

## न्याय मिळावा म्हणून नरेंद्र पडोळेंचे निंभारी येथे ठिय्या आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अचलपूर**

निंभारी सावंगा येथील चंद्रभागा नदीच्या संगमावर उभारण्यात आलेल्या चंद्रभागा प्रकल्पामुळे परिसरातील अनेक शेतकरी आणि नागरिक अडचणीत आले आहेत. पाण्याची अडवणूक झाल्यामुळे नदीकाठची घरे, शेती आणि रस्ते पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे असदपूर, शहापूर, रंगावासनी, खानापूर, चिचखेडा, येसूर्णा, निंभारी, सावळी बुजुर्ग, सावळी खुर्द या गावांतील शेतकरी आक्रमक झाले आहेत.

शेतकऱ्यांचा आरोप आहे की, प्रकल्पातील पुनर्वसनात निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाले असून, जमिनी व घरांच्या मोबदल्यात घरफोडी झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र पडोळे यांनी निंभारी येथे ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.या आंदोलनस्थळी चंद्रभागा प्रकल्पाचे अभियंता गुरव व आमदार गजानन लवटे यांनी भेट देऊन लवकरात लवकर चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. मात्र, शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे की, जर न्याय मिळाला नाही, तर प्रकल्पग्रस्त शेतकरी तीव्र आंदोलन छेडतील.

# रुक्मिणी नगरमध्ये रंगला रास गरबा महिलांच्या उत्साहात सामाजिक एकतेचा जागर

## आ.सुलभाताई खोडके,प्रीतीताई बंड यांनीही धरला फेर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

श्री रुक्मिणी रास गरबा महिला मंडळ, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर येथे रंगारंग रास गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विशेष आकर्षण ठरले, आमदार सौ. सुलभाताई खोडके, शिंदे गटाच्या नेत्या प्रीतीताई बंड, तसेच विदर्भ प्रजासत्ताकच्या संचालिका व संपादिका डॉ. शुभांगी जोशी यांनी गरब्यात सहभाग घेऊन मातेला वंदन करीत गरब्याच्या आंनद लुटला.

कार्यक्रमात मंडळाच्या वन्दना थोरात, नीता दातीर, संध्याताई, डॉ. उषाताई देशमुख व इतर कार्यकर्त्यांनी उत्साहात गरबा खेळत आनंदाची उधळण केली. स्थानिक महिलांनी आणि युवतींनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून गरब्याची रंगत वाढवली.

मंडळ नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत उपक्रम राबवत असते. यावर्षी प्रतिपदेच्या दिवशी माजी आमदार सुनिलभाऊ देशमुख यांच्या हस्ते जेष्ठ नागरिकांचा सत्कार ही करण्यात आला. तसेच समाजातील आरोग्यसेवक, डॉक्टर यांचाही सन्मान करण्यात आला.

श्री रुक्मिणी रास गरबा महिला मंडळ वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांसाठी आरोग्य, शिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करत असते. त्यांच्या उपक्रमांमुळे स्थानिक समाजाला आधार मिळतो, तसेच महिलांना नेतृत्व विकासाची संधी मिळते.अशा उपक्रमांमुळे सामाजिक एकोपा वाढतो आणि पारंपरिक संस्कृतीचे जतन होते. मंडळाचे कार्य संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

यावेळी वंदना थोरात, संध्या राठोर,ऊर्मिला भूगूल, नीता दातीर, उषा राठी, कृष्णा धोटे, अश्विनी गवई ,प्रिती थोरात, अनिला काझी,वैशाली वाणी, माधुरी सोनकुसरे उपस्थित होत्या.

# एपीएमसीतील गोपनीय दस्तावेजाचे चोरून काढले फोटो सचिवांकडून गाडगेनगर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल

## सदर फोटो माजी संचालक गणेश कडूंना पुरविल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

अमरावती अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य कार्यालयाचे दस्तऐवजाचे चोरुन फोटो काढून तक्रारकर्ते गणेश सखाराम कडुरा. नया अकोला ता.जि. अमरावती यांना उपलब्ध करुन दिले. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन संबंधीतावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी तक्रार एपीएमसीचे सचिव दिपक विजयकर यांनी गाडगे नगर पोलिस स्टेशनला दाखल केली आहे.




तक्रारकर्ता गणेश कडु यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे कडे ३० जुन २०२५ रोजी दिपक विजयकर सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती यांचे तात्काळ निलंबन करून तथा त्यांचा सचिव पदाचा पदभार काढून निपक्ष व्यक्ती अधिकारी यांना देण्या बाबत तक्रार केली होती. त्यावर विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था अमरावती यांनी सचिन एच. पतंगे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगाव खंडेश्वर, जि.एस. डावरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अमरावती, श्रीमती. पि. पि. पळसकर, मुख्य लिपीक अंतर्गत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली.चौकशी समिती समोर सुनावणी दरम्यान तक्रारकर्ते गणेश कडु यांनी सुध्दा माझे विरुध्द कागदपत्रे सादर केली. सदर कागदपत्राची मी मागणी केली असता मला चौकशी अधिकारी यांनी रितसर कागदपत्रे दिले. प्राप्त कागदपत्राचे अवलोकन केले असता कार्यालयातून माझे दुय्यम कर्मचाऱ्यांनी लायसन्स विभागातील अत्यंत महत्वाचे लायसन्स प्रतिचे व हजेरी रजिस्टरचे चोरुन फोटो काढले असल्याचे व ते तक्रारदारास पुरविलेले आहे असासंशय आहे.कार्यालयाचे दस्तएवजाचे चोरुन फोटो काढुन घेऊन जाणे व त्याच्या प्रिट काढून तक्रारकर्ते यांना पुरविणे यामध्ये माझी व बाजार समितीची प्रतिमा मलिन करण्याचे उद्देशाने वापरण्यात आलेले आहे. सदरची कृती फौजदारी स्वरुपाची असून भारतीय दंड संहिता कलम ३८०, ४२०, ४६८, ४६९ अंतर्गत गुन्हा आहे. कारण यात चोरी, फसवणुक आणि गोपनीयतेचा भंग या गोष्टीचा समावेश कार्यालयीन गोपनीय आहे. कागदपत्राचा गैरवापर केला असून फसवणुकीसाठी वापर केलेला आहे. त्यामुळे प्रकरणाची सखोल चौकशी करुन गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी तक्रार सचिव दिपक विजयकर यांनी गाडगेनगर पोलिस स्टेशनला दाखल केली आहे.

# गर्भवती गायेला विजेचा शॉक लागून मृत्यू; वणी गावात महावितरण विरोधात संताप



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ तिवसा**

तिवसा तालुक्यातील वणी गावात महावितरणच्या हलगर्जी कारभारामुळे एक दुर्दैवी घटना घडली आहे. गावातील शेतकरी दिनेश टेकाडे यांची गर्भवती गाय रस्त्यालगत असलेल्या धोकादायक डीपी (डिस्ट्रिब्युशन पॉइंट) च्या संपर्कात आल्याने विजेच्या शॉकने जागीच मृत्यूमुखी पडली. या घटनेमुळे गावात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही घटना दिनांक २७ सप्टेंबर रोजी शनिवार दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. टेकाडे यांची गाय पाणवठ्यावरून परत येत असताना गावठाणातील रस्त्यालगत असलेल्या डीपीजवळून जात होती. याचवेळी तिचा स्पर्श डीपीवरील उघड्या वायरला झाल्याने ती विजेच्या तडाख्यात अडकली आणि काही क्षणांतच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी महावितरणच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधला. वणी फिडरवरील वीज पुरवठा तत्काळ बंद करण्यात आला. त्यानंतर महावितरणचे अधिकारी आणि तिवसा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा केला.ग्रामस्थांनी यावेळी संतप्त प्रतिक्रिया दिली. त्यांच्या मते, ही डीपी अनेक दिवसांपासून अत्यंत धोकादायक अवस्थेत होती. या संदर्भात नागरिकांनी महावितरणकडे वेळोवेळी तक्रारी केल्या होत्या, मात्र दुर्लक्ष झाल्यामुळेच ही दुर्घटना घडली, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.शेतकरी दिनेश टेकाडे यांना या घटनेमुळे मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. मृत गाय गर्भवती होती, त्यामुळे दुहेरी नुकसान झाले आहे. महावितरण विभागाने तात्काळ नुकसानभरपाई द्यावी आणि गावातील धोकादायक डीपी त्वरित दुरुस्त करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ही गाय जणू गावाच्या रक्षणासाठीच बळी गेली. तिच्यावर ओढवलेला विजेचा धोका कुण्या माणसाच्या वाट्याला आला असता, तर आणखी मोठा अनर्थ घडला असता.

# धनगर समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षण मिळावे यासाठी आमदारांच्या घरासमोर घंटानांदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ अमरावती**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाला आमचे सरकार आले तर पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगरांना अनुसूचित जमातीचे आरक्षण देऊ असे सन २०१४ मध्ये आश्वासन दिले होते. तेव्हापासून सतत धनगर समाजाने महायुतीचे सरकार निवडून आणले असताना देखील अद्यापही आश्वासनाची पूर्तता केली नाही. आता एक महिन्याच्या आत धनगर समाजाला अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी आज धनगर समाजाच्या वतीने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या घरासमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले.सबंध धनगर समाजाच्या मतदारांनी लोकसभा विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीमध्ये भरभरून मतदान केले. राज्यात महायुती सरकारला सत्तेत बसवले आहे. या



राज्यातील धनगर आणि धनगड हे एकच असल्याचे भरपूर पुरावे सादर केले आहेत. मात्र सरकारला धनगर समाजाविषयी दया माया अथवा कुठल्याही प्रकारचे घेणे-देणे नसल्याचे दिसते आहे.आपण प्रत्येक ठिकाणी राजकारण केले. एस.टी. समाजाला धनगरांविषयी भडकावून दिले आणि दोन समाजात भांडण निर्माण होईल असे वातावरण तयार केल्याचाआरोपसुद्धा यावेळी केला आहे. फक्त ड आणि र या अक्षराच्या फरकामुळे आम्ही गेल्या ६५ वर्षापासून आरक्षणापासून वंचित आहे. मात्र आता धनगर समाज या राज्यकर्त्यांच्या फसव्या आश्वासनाला बळी पडणार नाही. धनगर समाजाची विनंती आहे की, येत्या एक महिन्याच्या आत आपण अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र धनगर समाजालाद्यावे, अन्यथा अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र न मिळाल्यास आम्ही २ ऑक्टोंबर २०२५ ला म्हणजे गांधी जयंती व दसरा (विजया दशमी) पासून बेमुदत उपोषणाला बसू असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# अमरावतीत 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' आरोग्य अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## हमालपुरा शिबिरात ६०० हून अधिक नागरिकांची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियानांतर्गत शहरी आरोग्य केंद्र, हमालपुरा येथे दिनांक २७ सप्टेंबर रोजी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात विविध आजारांची तपासणी करून ६३१ नागरिकांनी लाभ घेतला.



महानगरपालिकेच्या आयुक्त सौ. सौम्या शर्मा, अतिरिक्त आयुक्त सौ. शिल्पा नाईक, व उपायुक्त सौ. डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या नेतृत्वाखाली शिबिर यशस्वीपणे पार पडले. उद्घाटन शहराचे साथरोग नियंत्रण अधिकारी डॉ. रुपेश खडसे यांनी भारत मातेच्या प्रतिमेला हार अर्पण करून केले.

शिबिरात स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, दंतरोग, नेत्ररोग, सिकलसेल, क्षयरोग, मनोविकार यांसह विविध तपासण्या करण्यात आल्या.स्त्रीरोग तज्ञ डॉ. आरती मुरके, डॉ. सरीता सारडा आदींनी महिलांची तपासणी केली, तर डॉ. कौस्तुभ देशमुख आणि इतर बालरोग तज्ञांनी लहान मुलांची तपासणी केली. जनरल तपासणीसाठी डॉ. ओम पायघन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काम पाहिले. दंत आणि नेत्र तपासणीसाठी डॉ. प्रसाद टीम व दिशा आय फाउंडेशन कार्यरत होते.सिकलसेल, त्वचा, कर्करोग, क्षयरोग, एनसीडी तपासणींसाठी अनुभवी डॉक्टर आणि तज्ज्ञ कार्यरत होते. रक्त तपासणी, लसीकरण, ABHA आणि गोल्डन कार्ड नोंदणी देखील करण्यात आली. याशिवाय, ५ बाटल्या रक्तदानही झाले.शिबिरात स्वच्छता ही सेवा उपक्रमाअंतर्गत श्वेता बोके व टीमने जनजागृती केली. हैदर अली, बबन खंडारे, श्रेयस नाडे आणि इतर आरोग्य सेवकांनी डेंग्यू, मलेरियाविषयी नागरिकांना जागरूक केले.हे आरोग्य शिबिर हा सामाजिक बांधिलकीचा एक उत्तम नमुना ठरला असून नागरिकांमध्ये आरोग्यविषयी जागरूकता निर्माण करण्यास मोठे योगदान दिले.

# पिकं गेली, साथ आली कीटकांची संत्रा शेतकऱ्यांची दैना : सरकार कुठं आहे?

## अमरावती जिल्ह्यात संत्रा उत्पादकांचे हाल, मोर्च्याचा इशारा : शेकडो टन संत्रे फेकले नदीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

गेल्या काही दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील कविठा बु. परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पारंपरिक पिके – तुर, सोयाबीन, कापूस यांसोबत अचलपूर, मोर्शी, वरुड, चांदूरबाजार परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचेही प्रचंड नुकसान झाले आहे.



जमिनीवर गळून पडलेली हजारो क्विंटल संत्री पावसात सडली. सडलेल्या फळांवर कीटकांचा प्रादुर्भाव झाला आणि त्याचा परिणाम झाडांवर लटकलेल्या संत्र्यांवरही झाला. हताश झालेल्या शेतकऱ्यांनी मेहनतीने पिकवलेली ही संत्री गोळा करून जवळच्या नदीत फेकून दिली. संत्रा उत्पादकांसाठी ही वेळ वेदनादायक असून, वर्षभराच्या कष्टांवर अक्षरश: पाणी फेरल्यासारखी अवस्था झाली आहे.

या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्यांनी आठवडाभरात सरकारने मदतीबाबत ठोस निर्णय न घेतल्यास तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची हमी द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनांनी केली आहे.

# नवरात्रीचे नवरंग....

## नवरात्रीचा आजचा आठवा दिवस; आजचा रंग मोरपंखी



मोरपंखी हरित रंगात नटलेल्या महिला महाविद्यालय, अमरावतीच्या प्राध्यापिका – निसर्गाची माधुर्यपूर्ण छटा, संस्कृतीची समृद्ध परंपरा आणि स्त्रीशक्तीची सौंदर्यपूर्ण झलक यांचा सुरेख संगम त्याचबरोबर ऐक्य, शालीनता आणि प्रेरणा यांचे अनुपम दर्शन घडते आहे.

# धारणी तालुक्यात अंगणवाडीत एक्सपायर्ड धान्य व खाद्यतेलाचा वापर; सेविका निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९दूनी (धारणी)**

येथील अंगणवाडी केंद्रात लहान मुलांना दिल्या जाणाऱ्या अन्नसामग्रीमध्ये मुदत संपलेले (एक्सपायर्ड) धान्य व खाद्यतेल वापरल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे लहान मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाल्याची तक्रार गावातील सरपंच व नागरिकांनी केल्यानंतर ही बाब पुढे आली.

या गंभीर प्रकरणाची माहिती मिळताच श्री. अमोल अंबुलकर,



एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी (उऊझज), धारणी यांनी तात्काळ दौरा करून पंचनामा केला. तपासणीदरम्यान अंगणवाडी सेविका मीना ठाकरे यांनी वापरलेले धान्य व खाद्यतेल यांची गुणवत्ता तपासण्यात आली. त्यात एक्सपायर्ड अन्नसामग्रीचा वापर झाल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकारामुळे लहान बालकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्यामुळे संबंधित अंगणवाडी सेविका मीना ठाकरे यांच्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

गावकऱ्यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघड झाला असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधित खात्याने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# गवई कुटुंबाच्या संघ कार्यक्रमातील उपस्थितीवरून राजकीय चर्चांना उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

येत्या ५ ऑक्टोबरला अमरावतीमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमासाठी कमलताई गवई यांना आमंत्रण देण्यात आले असून त्यांनी हे निमंत्रण स्वीकारले आहे. याबाबत राजेंद्र गवई, कमलताई गवई यांचे सुपुत्र, यांनी प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले की हे केवळ एका सामाजिक निमंत्रणाच्या रूपात पाहावे, याला कोणतीही राजकीय अर्थछटा लावू नये.

कार्यक्रमाला गेल्याने आमची विचारधारा बदलणार नाही. गवई कुटुंबाचे पक्षविरहित संबंध असून आम्ही सर्वधर्मसमभाव मानणारे आहोत,असे राजेंद्र गवई यांनी सांगितले.त्यांनी पुढे स्पष्ट केले की,



यापूर्वीही नागपूर येथे झालेल्या संघाच्या कार्यक्रमात दिवंगत दादासाहेब गवई आणि राजाभाऊ खोब्रागडे यांनी हजेरी लावली होती. त्यामुळे ही कोणतीही नवीन किंवा अनपेक्षित गोष्ट नाही.

दादासाहेब गवई यांचे संबंध इंदिरा गांधींसोबत अतिशय जवळचे होते, तसेच विदर्भातील नेते गंगाधर फडणवीस यांच्यासोबतही त्यांचे चांगले संबंध होते. संबंध हे भावा-भावांचे होते, मात्र आमची विचारधारा ठाम आणि वेगळी आहे, असेही ते म्हणाले.

**विरोधकांकडून सोशल मीडियावर होणाऱ्या टीकेवरही साधला निशाणा**

गवई साहेबांच्या विरोधकांच्या पोटात दुखत आहे, त्यामुळेच त्यांच्याकडून उलटसुलट टीका केली जात आहे. भूषणजी गवई मोठ्या पदावर गेल्यानंतर मुद्दामून टीका केली जात आहे. काही सकारात्मक प्रतिक्रिया देखील आहेत, पण मी त्याकडे फार लक्ष देत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमासंबंधी अंतिम निर्णय आईसाहेबांनी घेतले असून, एक मुलगा म्हणून मी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

# आ. रवि राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी धनगर समाजाचा मोर्चा

## मोर्चेकऱ्यांसाठी जेवण करून दिला ऐक्यतेचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गातील आरक्षण तातडीने लागू करावे, या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर विविध ठिकाणी आंदोलन व मोर्चे





काढले जात आहेत. अशाच एका मोर्चाद्वारे सकल धनगर समाज, अमरावती जिल्ह्याच्या वतीने आमदार रवि राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी निवेदन देण्यासाठी आगमन झाले.

मोर्चेकरी समाजबांधवांच्या स्वागतासाठी आ. रवि राणा यांनी स्वतः पुढाकार घेतला आणि सर्व बांधवांसाठी उत्कृष्ट जेवणाची व्यवस्था केली. विशेष म्हणजे, त्यांनी स्वतः धनगर समाजाच्या मोर्चेकरांसोबत जेवण करून सामाजिक ऐक्यतेचा संदेश दिला.

यावेळी बोलताना आ. रवि राणा म्हणाले, मी ओबीसी व बहुजन समाजाचा प्रतिनिधी आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या लढ्यात मी पूर्ण ताकदीने पाठिंबा देईन. हा प्रश्न मी सभागृहात रेटून धरणार असून, संविधानाच्या चौकटीत राहून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. तसेच त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्व बहुजनांचे मुख्यमंत्री आहेत आणि मराठा समाजाप्रमाणेच धनगर समाजालाही योग्य न्याय दिला जाईल.

मोर्चामध्ये दिलीप येडतकर, आशिष माहोरे, माधव अवघड, अर्चना तालन, प्रदीप अलोने, प्रेमा लव्हाळे, डॉ. पाथुरडे, साधना मस्के, कल्पना ढोके यांसह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

या उपक्रमातून आ. रवि राणा यांनी समाजातील मागासवर्गीयांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता आणि समर्पण दाखवले आहे. मोर्चेकऱ्यांनीही त्यांच्या या सहकार्याचे मनापासून स्वागत केले.

# न्यायालयाचा अपमान, जातीय विष ओकणाऱ्या अनिरुद्धाचार्यावर ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची बौद्ध समाजाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

भारताचे सरन्यायाधीश मा. भुषण गवई यांच्याविरोधात जातिवाचक, अपमानजनक आणि अपकीर्तिकर भाषा वापरून देशातील सर्वोच्च न्यायालयाची प्रतिमा मलिन करण्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. अनिरुद्धाचार्य नावाच्या स्वयंघोषित धर्मगुरूने एका लाइव्ह प्रसारणादरम्यान सरन्यायाधीशांविषयी असभ्य आणि विषारी भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावरून संपूर्ण बौद्ध समाजात तीव्र संताप निर्माण झाला असून,



अमरावतीतील अमोल इंगळे आणि समस्त बौद्ध समाजाच्या वतीने गाडगे नगर पोलिसांत तक्रार सादर करण्यात आली आहे.

अनिरुद्धाचार्य यांनी केवळ भुषण गवई यांच्याच नव्हे, तर भारतीय संविधानाचा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीचा अपमान केला आहे. त्यांच्या वक्तव्यांमुळे जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असून, त्यांचे हे कृत्य समाजात अराजक माजवणारे आहे.तसेच, ते बौद्ध समाजाबाबत अपप्रचार करत असून, अशा व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई होणे अत्यावश्यक असल्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांनी अनिरुद्धाचार्य यांच्याविरोधात ॲट्रोसिटी कायदा व भारतीय सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

बौद्ध समाजाच्या भावना दुखावणाऱ्या, न्यायव्यवस्थेचा अपमान करणाऱ्या व्यक्तीला माफ न करता कठोर शिक्षा व्हावी, अशी संतप्त मागणी समाजातून होत आहे.

# मिलिंद नार्वेकरांची पोस्ट झाली चर्चेचा विषय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

दरम्यान, भारत-पाकिस्तान सामन्याच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने रान उठवलं असतानाच उद्धव ठाकरेंचा एकेकाळचा राईट हँड असणाऱ्या नेत्याला मोह आवरला नाही. उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय मिलिंद नार्वेकर यांनी सामन्यानंतर एक पोस्ट शेअर करत हिंदुस्तान जिंदाबाद! म्हटले. त्यांच्या या पोस्टने राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला उधाण आलं आहे. उद्धव ठाकरे यांचा सामन्याला स्पष्ट विरोध असताना नार्वेकरांच्या पोस्टने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

आशिया कप २०२५ च्या अंतिम सामन्यात भारताने चुरशीच्या लढतीत पाकिस्तानचा दारूण पराभव केला. अंतिम सामन्यात भारताची सुरुवात खराब झाली असतानाही तळ ठोकून खेळलेल्या तिलक वर्माच्या नाबाद ६९ धावांच्या अर्धशतकी खेळीने विजय भारताच्या झोळीत टाकला. सामना शेवटच्या ओव्हरपर्यंत रंगतदार ठरला. या विजयामुळे संपूर्ण देशात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भारतीय संघाचे कौतुक होत आहे. मात्र सामन्यापूर्वी आणि त्यादरम्यान झालेल्या राजकीय घडामोडींमुळे या विजयाला वेगळं वळण लागल्याचं पाहायला मिळत आहे.

# राज्यात अतिवृष्टीचे गंभीर संकट, एसटीचे ३४ आगार प्रमुख बेपत्ता; महामंडळाकडून कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ नागपूर**

राज्यात अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. यावेळी एसटीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना देखील एस टी महामंडळाच्या २५१ पैकी ३४ आगारातील आगरप्रमुख हे आपल्या कर्तव्यावर हजर नसल्याचे एका गोपनीय अहवालामध्ये पुढे आले आहे. या अधिकाऱ्यांवर महामंडळाकडून कारवाईचे संकेत मिळत आहे. त्याबाबत परिवहन सूचनाही दिल्या गेल्या आहे.

राज्यात मागील काही दिवसांपासून परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक रस्ते बंद आहेत, पुलावर पाणी आले आहे. अशा परिस्थितीमध्ये एसटीची वाहतूक अनेक ठिकाणी ठप्प झाली आहे. अनेक प्रवासी बसस्थानकावर अडकून पडले आहेत. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात हजर राहून आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडणे ऐवजी काही आगार प्रमुख कर्तव्यावर गैरहजर असल्याचे एसटीच्या गोपनीय अहवालातून पुढे येत आहे.



दरम्यान या गैरहजर आगारप्रमुखांनी परिस्थितीचे गांभीर्य न ओळखता अत्यंत बेजबाबदार वर्तन केले आहे. या कर्तव्यात कसूर करणाऱ्या आगारप्रमुखांना संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कारणे दाखवा नोटीस बजावण्याच्या सूचना महामंडळ मुख्यालयाकडून करण्यात आल्या ाहे. त्यामध्ये आगार प्रमुखांचा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईणार असल्याचा महामंडळाचा दावा आहे. हे आगारप्रमुख ज्या विभाग नियंत्रकांच्या अखत्यारित काम करतात त्या विभाग नियंत्रकांना देखील याबाबत विचारणा केली जाणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या खात्याकडून स्पष्ट केले गेले आहे.

**आगार प्रमुखांवर पालक म्हणून**

आगारप्रमुख हा एसटी प्रशासनाचा मुख्य घटक आहे. त्याच्या हाताखाली शेकडो कर्मचारी काम करत असतात. तो ज्या आगारात कार्यरत असतो, तेथे अनेक बसेस रात्रपाळीला मुक्कामी असतात. तसेच लाखो रुपये किमतीचे ऑइल, इंधन व इतर सुटे भाग तिथे असतात. याबरोबरच तिकीट विक्री मधून आलेली मोठी रक्कम देखील आगारात ठेवण्यात आलेली असते. अशा परिस्थितीमध्ये एक पालक म्हणून आगारप्रमुखांवर मोठी जबाबदारी असते. त्याने आगारात दररोज उपस्थित राहून या सर्वांना मार्गदर्शन करणे व त्यांच्यावर अंकुश ठेवणे गरजेचे असते. परंतु काही आगारप्रमुख हे आपल्या आगारात उपस्थित नसल्याचे सुरक्षा व दक्षता खात्याच्या गोपनीय अहवालात स्पष्ट झाल्याने या आगार प्रमुखांच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत